

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १४ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹




## मुरुडमध्ये मिरवणुकीवर दगडफेक

# विसर्जनाला गालबोट

- भोगेश्वर पाखाडीच्या मिरवणुकीतील घटना
- घटनेमागचा खरा सूत्रधार कोण? नागरिकांमध्ये चर्चा



• (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

### पोलीस ठाण्याला घेराव

**जोपर्यंत अटक होत नाही, तोपर्यंत या ठिकाणी ठिय्या आंदोलन करु, असा इशारा यावेळी नागरिकांनी दिला. तसेच 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया, भारत माता की जय, जय श्रीराम'च्या घोषणांनी पोलीस ठाण्याचा परिसर दणाणून सोडला.**

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील भोगेश्वर पाखाडी येथील गौरी-गणपती विसर्जन मिरवणुकीला गालबोट लागले. दोन अल्पवयीन मुलांकडून विसर्जन मिरवणुकीदरम्यान दगडफेक करण्यात आली. त्यामुळे काही काळ याठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. ही घटना गुरुवारी (दि. १२) घडली. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मुरुड पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होत परिस्थिती नियंत्रणात आणली. रायगड जिल्ह्यात सर्वधर्मीय गेली कित्येक वर्षे गुण्यागोविंदाने नांदत आहेत. विविध सण-उत्सव एकत्र येऊन साजरे करीत आहेत. परंतु, निवडणुका तोंडावर आल्या असताना अशा पद्धतीचे दोन समाजात वितुष्ट निर्माण करण्याचे काम काही समाजकंटकांकडून करण्यात आले आहे, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी सायंकाळच्या दरम्यान भोगेश्वर पाखाडीतून गौरी-गणपती मिरवणूक ढोल-ताशांच्या गजरात वाजतगाजत येत होती. यावेळी गणेशभक्त नाचगाण्यात दंग झाले होते. दरम्यान, ही मिरवणूक जगदीश पाटील यांच्या निवासस्थानाजवळील रस्त्यावरुन जात असताना अचानक शेजारील कंपाऊंडमधून मिरवणुकीवर दगडफेक करण्यात आली. दरम्यान, गणेशभक्त महिला प्रिता चौलकर यांच्या बाजूने एक दगड आला, पान २ वर

### एकोप्याला ग्रहण?

मुरुडमध्ये गेली अनेक वर्षे सर्वधर्मीय आनंदाने वास्तव्य करीत आहेत. सर्व सण-उत्सवात नेहमीच एकोपा दिसून आला आहे. कोणत्याही सणाला गालबोट लागल्याचे ऐकिवात नाही. असे असताना इतक्या वर्षांनंतर पहिल्यांदाच असे काय झाले की, दोन समाजामध्ये दरी निर्माण करण्याचा प्रयत्न झाला, त्यांच्या उत्सवाला गालबोट लावण्यात आले? तर, याच्या मागे नेमके कोण आहे? कुठल्या तरी प्रतिगामी शक्तीचा हात असल्याचा संशय व्यक्त होत असून, राजकारणाचा वापर त्यांनी दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्यासाठी, भांडणे लावण्यासाठी केल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### स्थानिक आमदार आहेत कुठे?

भारतीय संस्कृतीतील विविध सण एकत्रितपणे साजरे करणाऱ्या मुरुडमध्ये गणेशोत्सवाला जाणूनबुजून गालबोट लावण्याचा प्रयत्न प्रतिगामी शक्तींनी केल्याचा आरोप नागरिकांचा आहे. असे असताना दोन समाजामधील ही तेढ मिटविण्यासाठी त्यांचे स्वघोषित पालकत्व स्वीकारणाऱ्या स्थानिक आमदारांनी मात्र मुरुडमधील या घटनेनंतर तातडीने जाणे टाळले असल्याचे चित्र गणेश विसर्जनाच्या दिवशी दिसले. यामुळे दोन्ही समाजातील नागरिकांच्या आशांवर पाणी पडले.

## गणेशभक्तांवर मधमाशांचा हल्ला



। तळा । वार्ताहर ।

तालुक्यातील हनुमान नगर येथे गणपती विसर्जनासाठी गेलेल्या गणेशभक्तांवर मधमाशांनी हल्ला चढवल्याने एकच खळबळ उडाली आहे. मधमाशांनी जवळपास १५ ते २० भाविकांना दंश केला असून, त्यात लहान मुलांचाही समावेश आहे. जखमींना तात्काळ तळा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, तालुक्यातील हनुमान नगर येथील ग्रामस्थांकडून आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी गावातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत गावातील सर्व ग्रामस्थ, महिला व लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सायंकाळी सहा वाजताच्या दरम्यान विसर्जन मिरवणूक खाडीकिनारी आली असता काही कळायच्या आत अचानक उठलेल्या मधमाशांनी भाविकांवर एकच हल्ला चढवला. यामुळे सर्वत्र एकच पळापळ झाली. मधमाशांनी जवळपास १५ ते २० भाविकांना दंश केला. ज्यामध्ये लहान मुलांचादेखील समावेश होता. या सर्वांना तातडीने तळा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल मोघे यांनी जखमींवर तातडीने उपचार करून काहींना सोडून दिले. तर, ज्यांची प्रकृती गंभीर होती अशांना काही काळ निरीक्षण करून त्यांनाही घरी आराम करण्याचा सल्ला दिला.

## महिला अधिकाऱ्यावर लैंगिक अत्याचार

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेलमधील बँकेत कामाला असलेल्या २९ वर्षीय कर्मचाऱ्याने बँकेतील ४१ वर्षीय महिला अधिकाऱ्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. पनवेल शहर पोलिसांनी या कर्मचाऱ्याविरुद्ध बलात्कारासह धमकी देणे, मारहाण करणे आदी कलमानुसार गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

या प्रकरणातील ४१ वर्षीय पीडित महिला पनवेलमधील बँकेत अधिकारी म्हणून कार्यरत आहे. तर, तिच्यावर लैंगिक पान २ वर

## चाकरमान्यांच्या सेवेसाठी लालपरी

प्रमोद जाधव

- रायगडमधून ६०० बसेसचे नियोजन
- ठाणे, मुंबई, पालघर, पुण्यामधून मागविल्या बसेस

। अलिबाग ।

सहा दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन झाल्यानंतर मुंबई, ठाण्यामधील चाकरमानी गुरुवारी रात्रीपासून परतीच्या मार्गावर निघाले आहेत. चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा, यासाठी एसटी महामंडळ रायगड विभागाकडून चाकरमान्यांच्या सेवेसाठी सहाशे बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. गुरुवारी रात्रीपासून शुक्रवारपर्यंत तीनशेहून अधिक बसेस परतीच्या मार्गावर गेल्या असून, १५ तारखेपर्यंत लालपरी चाकरमान्यांच्या सेवेसाठी असणार आहेत, अशी माहिती विभाग नियंत्रक कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये सात सप्टेंबरला घरोघरी बाप्पांचे आगमन झाले. एक लाख तीन हजारांहून अधिक पान २ वर



### विविध मार्गांवर जादा बसेस

प्रवाशांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा यासाठी अलिबाग एसटी बस आगारातून शुक्रवारी सकाळपासून वेगवेगळ्या मार्गांवर जादा बसेस सोडण्यात आल्या आहेत. रेवदंडा- बोरीवली, रेवदंडा-कल्याण, अलिबाग-दादर, अलिबाग-ठाणे, अलिबाग-सांबरी- बोरीवली या बसेसचा समावेश असून, प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

## खारघरमध्ये डेंग्यू, स्वाईन फ्ल्यूची साथ

। पनवेल । वार्ताहर ।

खारघर वसाहतीत डास, मच्छर यांचा प्रादुर्भाव वाढल्याने सर्दी, ताप, खोकला, हिवताप, डेंग्यू आणि स्वाइन फ्ल्यूच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याचे चित्र दिसत असून, खारघरमधील नागरी आरोग्य केंद्र आणि खासगी रुग्णालये रुग्णांच्या गर्दीने फुलून गेली आहेत. डेंग्यू, स्वाइन फ्ल्यू आजारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

खारघर वसाहतीत आजही काही भागात मलनिस्सारण वाहिन्या भरल्याने पान २ वर



• रायगड जिल्हा पोलीस (अलिबाग) यांच्यावतीने गणेशोत्सवानिमित्त महाआरती करण्याचा बहुमान शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांना देण्यात आला होता. यावेळी त्यांनी रायगड पोलिसांचे आभार मानले. याप्रसंगी त्यांच्यासमवेत पोलीस प्रशासनातील पदाधिकारी व पोलीस बांधव आणि कार्यकर्ते उपस्थित होते. (छायाचित्र : अमोल नाईक)

## 'रणरागिणी' वक्तृत्व स्पर्धा; तीन गटांसाठी ४० स्पर्धक

### केतन गुप्ता, अदिती पाटील अन् आराध्य पाटील प्रथम




। रायगड । प्रतिनिधी ।

माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेमध्ये रणरागिणी मीनाक्षीताई पाटील यांचा जीवनपट उलगडणारी भाषणे झाली. चिमुकल्यांपासून ज्येष्ठ वक्त्यांपर्यंत सर्वांनीच मीनाक्षीताई पाटील यांचा संघर्षरूपी यशस्वी प्रवास उपस्थित श्रोत्यांसमोर मांडला. वक्त्यांच्या यशस्वी सादरीकरणामुळे परीक्षकांनादेखील गुण देताना भाषणांमधील बारकावे तपासावे लागले. अटीतटीच्या या स्पर्धेत खुल्या गटामध्ये केतन गुप्ता, मध्यम गटामध्ये अदिती पाटील आणि कनिष्ठ गटामध्ये आराध्य पाटील यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांची ७७ वी जयंती पेझारी येथे संपन्न झाली. यावेळी मीनाक्षीताई पाटील यांचा जीवनपट उपस्थितांसमोर मांडणारी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन माजी आमदार पंडित पाटील यांच्या उपस्थितीत पार पडले. या स्पर्धेसाठी देण्यात आलेल्या विषयांवर तीन गटात विभाजित केलेल्या स्पर्धकांनी मीनाक्षीताई यांच्यावरील शब्दबद्ध जीवनपट सादर केला आणि उपस्थितांकडून वाहवा मिळवली. या स्पर्धेतील वक्त्यांची भाषणे ऐकून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी माजी आमदार पंडित पाटील, माजी नगराध्यक्ष सुनीता नाईक, राजिप माजी अध्यक्ष ॲड आस्वाद पाटील, शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, राजिप माजी अर्थ बांधकाम सभापती चित्रा पाटील, राजिप माजी सदस्य भावना पाटील, युवा नेते सवाई पाटील, आंबेपूर सरपंच सुमन पाटील, शैला पाटील, साधना पाटील, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप नाईक, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सचिन जोशी, सुरेश घरत, माजी नगरसेवक अनिल चोपडा, माजी नगरसेविका वृषाली ठोसर, माजी नगरसेविका संजना किर, कुंदा गावंड, जगन्नाथ पाटील, अनिल पाटील, सुरेश म्हात्रे, अशोक कुकलारे, पान २ वर



## पान १ वरुन

## विसर्जनाला गालबोट

तद्नंतर दुसरा दगड वैशाली म्हात्रे यांच्या हाताला जोरदार लागला. सतत दगड आल्याने गणेशभक्तांनी दगड येणाऱ्या कंपाऊंडमध्ये गेट उघडून घुसण्याचा प्रयत्न केला. परंतु, गेटला आतून कडी असल्याने ते उघडता आले नाही. शेवटी आळीतील मुलांनी कंपाऊंडवर चढून आत प्रवेश केला. त्यावेळी दोन लहान मुले जाणूनबुजून मिरवणुकीवर दगड मारत असल्याचे निदर्शनास आले. आम्हाला पाहून ती मुले पळून गेली. परंतु, या दगडफेकीत अनेक महिला जखमी झाल्या असून, काहींना मुका मार लागला आहे. ही बातमी मिळताच तात्काळ मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उदय झावरे आपल्या फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मिरवणुकीत सहभागी असणाऱ्या गणेशभक्तांना शांत राहण्याचे आवाहन केले. पोलिसांच्या आवाहनानंतर वातावरण शांत झाले, त्यानंतर मिरवणूक मार्गस्थ झाली. पोलीस बंदोबस्तात बाप्पांचे विसर्जन पार पडले. त्यानंतर नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतल्याने याविषयी चर्चा करण्यासाठी शुक्रवारी सकाळी ११ वाजता पोलीस ठाण्यात येण्याचे आवाहन मुरुड पोलिसांकडून करण्यात आले होते. परंतु, पोलिसांकडून सकाळपर्यंत त्या दोन्ही मुलांवर, तसेच या कृत्यास प्रोत्साहन देणाऱ्या त्यांच्या पालकांवर कोणतीही कारवाई करण्यात न आल्याने होत नसल्याने सकाळच्या दरम्यान शेकडो नागरिकांनी पोलीस ठाण्यात येऊन पोलिसांना घेराव घालून जाब विचारला. दोन्ही मुलांना, पालकांना अजूनपर्यंत अटक का झाली नाही? त्यांना तात्काळ अटक करावी, अशी मागणी केली. परंतु, सकाळपासून तीन तास होऊन गेले तरी कारवाई होताना दिसत नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी अलिबाग विभागीय पोलीस अधिकारी विनीत चौधरी यांनी नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले. परंतु, नागरिक ऐकण्याच्या मनःस्थितीत नसल्याने त्या मुलांना, त्यांच्या पालकांना अटक करा, अशा घोषणा नागरिकांकडून सारख्या-सारख्या येत असल्याने परिसर पुन्हा दुमदुमून गेला. अखेर पोलिसांनी तक्रार नोंद घेण्यास सुरुवात केली. तद्नंतर नागरिक शांत झाले. दरम्यान, घरातून आवश्यक असेल तर बाहेर पडा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. या घटनेने मुरुड शहरातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने दिवसभर बंद ठेवून या घटनेचा निषेध व्यक्त केला.

## खारघरमध्ये डेंग्यू, स्वाईन फ्ल्यूची साथ

रस्त्यावरुन दुर्गंधीयुक्त पाणी वाहत असल्याचे चित्र दिसत आहे. सांडपाण्याचा निचरा होत नसल्यामुळे डासांची उत्पत्ती वाढल्याने जुलै महिन्यात खारघरमध्ये डेंग्यूचे ११, तर हिवतापाचे २५ रुग्ण आढळून आले होते. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून वातावरणात बदल झाल्यामुळे सर्दी, ताप, खोकला, हिवताप, डेंग्यू आणि स्वाइन फ्ल्यू आजाराच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे.

## चाकरमान्यांच्या सेवेसाठी लालपरी

ठिकाणी गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. गणेशोत्सवासाठी मुंबई, ठाणे येथील चाकरमानी गावी आले होते. जिल्ह्यामध्ये गुरुवारी सहा दिवसांच्या बाप्पासह गौराईला निरोप देण्यात आला. त्यानंतर चाकरमानी परतीच्या मार्गावर निघाले. काही चाकरमान्यांनी विसर्जन झाल्यावर परतीचा मार्ग स्वीकारला, तर काही चाकरमानी शुक्रवारी सकाळपासून परतीच्या मार्गावर निघाले. त्यामुळे अलिबागसह जिल्ह्यातील बस आगारात प्रवाशांची गर्दी झाली होती. परतीच्या प्रवासासाठी निघालेल्या प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी सहाशेहून अधिक बसेसचे नियोजन करण्यात आले होते. ठाणे, मुंबई, पालघर, पुणे जिल्ह्यांतून दोनशे ज्यादा बसेस मागविण्यात आल्या आहेत. शुक्रवारपर्यंत तीनशे बसेस चाकरमान्यांना घेऊन त्यांच्या निश्चित स्थळी गेल्या आहेत. त्यामुळे १५ सप्टेंबरपर्यंत प्रवाशांची स्थानकात गर्दी असणार आहेत. प्रवाशांच्या सेवेसाठी महामंडळ विभागाची लालपरी सज्ज असून, प्रवाशांना घेऊन मुंबई, ठाण्याकडे निघाली असल्याची माहिती महामंडळाकडून देण्यात आली.

## महिला अधिकाऱ्यावर लैंगिक अत्याचार

अत्याचार करणारा आरोपीदेखील त्याच बँकेमध्ये चालक म्हणून कामाला आहे. काही महिन्यांपूर्वी आरोपी कर्मचाऱ्याने या महिलेसोबत मैत्री करुन तिच्यासोबत शरीरसंबंध प्रस्थापित केले होते. त्यावेळी आरोपीने पीडित महिलेसोबतचे व्हिडीओ आणि फोटो काढले होते. त्यानंतर त्याने पीडित महिलेचे त्याच्यासोबत असलेले व्हिडीओ आणि फोटो तिच्या घरच्यांना तसेच बँकेतील इतर कर्मचाऱ्यांना दाखविण्याची धमकी देऊन तिच्यावर बँकेच्या दुसऱ्या मजल्यावरील स्टोअररुमध्ये तसेच पनवेलमधील त्याच्या घरी नेऊन अनेकवेळा जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले. दिवसेंदिवस सदर प्रकार असह्य झाल्याने पीडित महिलेने त्याला विरोध करण्यास सुरुवात करून महिलेने पनवेल शहर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

## 'रणरागिणी' वक्तृत्व स्पर्धा; तीन गटांसाठी ४० स्पर्धक

प्रीतम म्हात्रे, अतुल म्हात्रे, सुनीता नाईक, खालापूर नगराध्यक्ष संतोष जंगम, खालापूर मा. नगराध्यक्ष शिवानीताई जंगम, किशोर धारिया, गौतम पाटील, अनिल पाटील, सिद्धिनाथ पाटील, कुंदा गावंड, अर्चनाताई पाटील, शंकर अप्पा, सखाराम पवार, संजय पाटील, ठोसर मॅडम, संजना किर, सुनील झाका, निलेश थोरे, रचना थोरे, अनिल म्हात्रे, प्रकाश जैन, ललित जैन, सुरेश घरत, रमाकांत पाटील (उरण), सुदिन कांबळे, समीर अधिकारी, प्रशांत काळे, श्रीकांत पाटील, विविध राजकीय पक्षातील पदाधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते. नारायण नागु पाटील यांनी शेतकऱ्यांची चळवळ उभी केली. त्याचे प्रमोशन शेतकरी कामगार पक्षाने केले पाहिजे. शेतकऱ्यांना न्याय देणाऱ्या नारायण नागु पाटील यांची जयंती आणि पुण्यतिथी राज्यस्तरावर व्हायला हवी, त्यांच्या लढ्याचा इतिहास आजच्या तरुण पिढीला समजला पाहिजे. लाल बावटा संघर्षाचा ध्वज आहे. संघर्षाने मिळविलेले यश चिरकाल टिकते हा इतिहास आहे. शेतकरी आणि कामगारांसाठी चरीचा संप पुकारून शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारे पाटील कुटुंबीय आजही शेतकऱ्यांसाठी संघर्ष करीत आहे. या डाव्या विचारांच्या पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या रणरागिणीची म्हणजेच मीनाक्षी पाटील यांची आज जयंती आहे. या झुंजार नेतृत्वाचे विचार जनमानसात पोहोचविण्यासाठी चित्रा पाटील यांनी केलेले वक्तृत्व स्पर्धेचे नियोजन उत्तम आहे. परंतु, मीनाक्षी पाटील यांचे विचार देशपातळीवर पोहोचविण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाने प्रयत्न करायला हवेत, असे माजी आमदार पंडित पाटील म्हणाले.

शेतकरी कामगार पक्षाचे स्थान देशपातळीवर आजही अबाधित आहे. शेतकऱ्यांच्या संपाने रायगडसह देशाच्या राजकारणाला नारायण नागू पाटील हे संघर्ष योद्धे लाभले. त्यांच्या विचाराने प्रेरित होऊन संपूर्ण महाराष्ट्र त्यावेळी पेटून उठला होता. नानासाहेबांनंतर दत्ता पाटील, प्रभाकर पाटील, मीनाक्षी पाटील, जयंत पाटील, पंडित पाटील आणि मीनाक्षी पाटील अशी संघर्षाची ज्योत तेवत ठेवणारी नेतृत्वं लाभली. त्यांच्यापाठोपाठ चित्रलेखा पाटील, चित्रा पाटील आणि ॲड. आस्वाद पाटील यांनी संघर्षांच्या ज्योतीला मशाल बनविले आहे. राजकारणामधून समाजकारण साधण्याचा प्रयत्न शेतकरी कामगार पक्षाने अविरतपणे केला आहे. मीनाक्षी पाटील यांच्या वैचारिक बैठकीमधून आम्ही आमची राजकीय कारकीर्द सुरु केली आहे. मीनाक्षी पाटील यांचे विचार तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी सांगितले.

पेझारी येथे आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेसाठी ४० स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला. यामध्ये कनिष्ठ गटामध्ये आराध्य पाटील यांनी प्रथम, लाजरी पाटील यांनी द्वितीय, प्रचिती वाघमारे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. मध्यम गटात अदिती पाटील प्रथम, मनस्वी पाटील द्वितीय, पूर्व पाटील यांनी तृतीय क्रमांक पटकावला. खुल्या गटामध्ये केतन गुप्ता प्रथम, वैशाली पाटील द्वितीय आणि संतोष आंबेतकर यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

### जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे-तांबस, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमिन मिळकती त्या मिळकतींचे मालक १.श्रीम. रश्मी गिरीश शाह, २. श्री. राज गिरीश शाह यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे

| सर्व्हे. नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १० | १/इ | ०.०५.०० | ०.४५ |
| १० | ५ | ०.०३.८० | ०.४७ |
| १० | १/ह | ०.३३.०० | ३.०० |

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन २१ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि: १४/०९/२०२४

वकील
ॲड सचिन संजय सुर्वे
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५

### जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे-तांबस, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमिन मिळकती त्या मिळकतींचे मालक १.श्री. मिहीर सुरेश ठाकर यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणेः

| सर्व्हे नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १० | १/ड | ०.१३.९० | १.२४ |
| ९ | १ | ०.४४.५० | ४.३४ |
| ९ | ३ | ०.९७.९० | १३.२३ |
| ६ | १ | १.६०.७० पैकी खरेदी देणार यांच मालकीचे क्षेत्र ०.६०.०० | ९.६७ |

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतींच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन २१ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि: १४/०९/२०२४

वकील
ॲड सचिन संजय सुर्वे
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५

### पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### ई-निविदा सूचना

निविदा सूचना क्र.पमपा/बांधकाम/४४२४/प्र.क्र.०३/३८८२/२०२४ दिनांक : १३/०९/२०२४

**शुध्दीपत्रक**

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रू. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/ ११८/२०२४-२५ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ, प्रभाग क्र.०१ मधील ओवे कॅम्प खारघर येथे समाज मंदिर उभारणे | ५३,८१,६१२/- |

या कामाच्या ई-निविदेच्या शुध्दीपत्रकबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.१३/०९/२०२४ प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
अतिरिक्त आयुक्त I
पनवेल महानगरपालिका

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public that my client **M/s AADYA DEVELOPERS AND PROPERTIES LLP through** its Partners **Mr ARUN GANGARAM NIKALJE,** and **Mr RAJESH BAPURAO DONGARE** are negotiating with the Owner **MR SULEKH BALARAM BAIKAR** for the purchase of below mentioned Property on **"AS IS WHERE IS BASIS "**

Any person/party having any claim or any interest by way of ownership, sale, exchange, ortgage.gift,tenancy, lease, leave, license, trust, inheritance, bequeath,lien ,easement, or otherwise in the said premises or any part thereof is hereby required to communicate the same with relevant documents and details to the undersigned at the office address as mentioned herein below within 14 (Fourteen) days from the date hereof, otherwise the deal for purchase of the said property will be finalized and appropriate documents will be executed without any reference as regards to such purported claims or interest which shall be deemed to have been waived.

**DESCRIPTIONOFTHE PROPERTY**

All that piece or parcel of land lying and being S. No 1686/32, 1687/1 & 1688 Village Chaul, Taluka Alibag, Dist Raigad, adm. 20740 Square mtrs. (223245 Sq Ft).

**M/s Aadya Developers & Properties LLP,**
Laxmi-Niwas, W. M. Joshi Path,
Shivaji Nagar, Pune: 411 005
Cel No 9503108989

Place: Alibag
Date: 14th September 2024

### जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे-तांबस, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमिन मिळकती त्या मिळकतींचे मालक १.श्री.गिरीश वाडीलाल शाह, २.श्री.प्रियाल राज शाह यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे

| सर्व्हे. नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १० | १/क | ०.४६.८० | ४.०० |
| १० | १/ब | ०.१८.२० | १.५३ |

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतींच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन २१ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि: १४/०९/२०२४

वकील
ॲड. सचिन संजय सुर्वे
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
मो. नं ९०२८५४६१५७ /७३८५५४६१५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविणेत येते की, आमचे अशिल श्री. बाळाराम सखाराम पवार, आणि श्री. रामचंद्र सखाराम पवार रा. खरबाची वाडी, पो. चिंचवली तर्फे आतोणे, ता. रोहा यांनी श्री. रूपेश हिरू सानप, रा. संभे, पो. कोलाड, ता. रोहा, जि. रायगड आणि जोविता ब्रायन डिमेलो, रा. वसई पश्चिम, ठाणे यांस वकीला करवी कायदेशीर नोटीस पाठवुन दि. ३०.०५.२०२३ रोजीचे खालील वर्णनाच्या मिळकती सदर्भात झालेले अखत्यारपत्र दस्त नं. १३१४/२०२३ व दस्त नं. १३१५/२०२३ असे अखत्यारपत्र रद्द केले आहे.

सबब सदर जाहिर नोटीशींचे प्रसिध्दी नंतर दि. ३०.०५.२०२३ रोजीचे अखत्यारपत्र दस्त नं. १३१४/२०२३ व दस्त नं. १३१५/२०२३ अन्वये कोणीही कोणताही खरेदी व्यवहार करू नये. या जाहिर नोटीशीचे प्रसिध्दी नंतर खालील वर्णन केलेल्या मिळकती सदर्भात अखत्यारपत्रा आधारे खरेदी विक्री व्यवहार केलेस सदर व्यवहार आमचे अशिलांवर बंधनाकरक रहाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे दिघेवाडी, ता- सुधागड, जि- रायगड**

| अनु नं. | गट नं | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १ | २०२ | १-२४-०० | ०.७३ |
| २ | २०४अ | ०-२७-०० | ०.१२ |

पाली
दि. १४/०९/२०२४

सही/-
ॲड. समिर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

नि. ८/ड

### जाहिर नोटीस

**पाली येथिल मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे कोर्टात**

चौकशी अर्ज नं. १७/२०२४

हिरा राजेंद्र शेवाळे — अर्जदार
वगैरे ३

विरूध्द

कोणीही नाही

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१)कै. राजेंद्र रमेश शेवाळे हे पिराचा माळ, पाली, ता. सुधागड, जि. रायगड येथे वास्तव्यास होते. कै. राजेंद्र रमेश शेवाळे हे दिनांक ०२/११/२०२२ रोजी राहत्या घरी मयत झाले आहेत. कै. राजेंद्र रमेश शेवाळे यांस अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ ही आपत्य असे कायदेशीर वारस होते व आहेत.

२) कै. राजेंद्र रमेश शेवाळे यांस वरील अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ हेच कायदेशीर वारस असून अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही. सबब अर्जदार यांनी कै. राजेंद्र रमेश शेवाळे यांचे वारस असल्याचे ठरवुन मिळणेकामी मा. पाली दिवाणी व फौजदारी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

३) अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ यांस कै. राजेंद्र रमेश शेवाळे यांचे वारस असल्याचा दाखला देणेबाबत कुणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या मुदतीमध्ये मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर पाली यांचे न्यायालयात लेखी स्वरूपात कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचेही हरकत न आल्यास अर्जदार यांनी दाखल केलेले अर्जास कोणाचीही हरकत नाही असे समजुन मा. न्यायालय अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ यांस ते कै. राजेंद्र रमेश शेवाळे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मंजुर करेल व मागाहून आलेल्या हरकती मा. न्यायालयावर बंधनकारक राहणार नाही.

पाली
दिनांक :- २१/०९/२०२४ (कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
लिपिक
दिवाणी न्यायाधिश क. स्तर पाली
पाली, ता-सुधागड, जि-रायगड

सही/-
अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क. स्तर पाली
पाली, ता-सुधागड, जि-रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक १) श्री. भगवान दत्तू बडेकर २) श्री. बाळाराम दत्तू बडेकर, ३) श्रीम. कांता चंद्रकांत भोईर, ४) श्रीम. सुरेखा आत्माराम धारणे कडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे देऊळवाडी, तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे देऊळवाडी | ८ | २ | ०.५१.०० यापैकी दिलेले क्षेत्र ०.२०.०० | ८.८२ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. १४/०९/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या मिळकती, त्या मिळकतींचे मालक श्री. रविंद्र मनोहर पेठे यांच्याकडून खरेदी करण्याचा आमच्या अशिलांचा मानस आहे व त्या संबंधी उभयतांत वाटाघाटी सुरु आहेत. विद्यमान मालकांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतींचे त्यांचे मालकी हक्क निर्वेध व निजोखमी तसेच बोजाविरहीत असल्याचा भरवासा आमच्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे सोगांव व मौजे मुनवली, ता. अलिबाग, जि. रायगड**

| अनु. | मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | सोगांव | ३८ | ०-२२-३० ०-२३-०० पो.ख. ०-००-२० ०-४५-५० | रु. ५.५१ | |
| २. | सोगाव | ३९ | ०-३०-८० ०-४०-०० पो.ख. ०-००-२० ०-७१-०० | रु. ७.६२ | श्री. रविंद्र मनोहर पेठे |
| | | | पैकी श्री. रविंद्र मनोहर पेठे यांच्या मालकीची ० हे. ५० आर, आकार रु. ५.३६ एवढी मिळकत. | | |
| ३. | मुनवली | १४ | ०-३५-५० पो.ख. ०-०३-५० ०-३९-०० | रु.२.०५ | |
| | | | पैकी दक्षिणेकडील ० हे.१५.५० आर एवढी मिळकत. | | |

तरी वरील मिळकतींसंदर्भात कोणाचेही ताबा बयाणपावती, साठेकरार, गहाण, अदलाबदल, भेट, वाटप, देखभाल, धारणाधीकार, वारसा, मृत्युपत्र, ट्रस्ट, भाडेपट्टा हक्क किंवा इतर कोणताही हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात कळवावे. नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास असे गृहीत धरले जाईल की, वर नमुद मिळकतींसंदर्भात अन्य कुणाचेही हक्क अधिकार नाहीत व असल्यास ते सोडून दिले आहेत.

अलिबाग
ता. १४/०९/२०२४

ॲड. विधान अरविंद पाटील
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँक समोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बागायत मिळकत आमच्या अशिलांनी सदर जमिनीचे मालक यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**:मिळकतीचे वर्णन :**
**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रूपै.) |
|---|---|---|---|
| नागांव | २४४ | ०.१२.४० पैकी ०-०८-६० | २.८१ |

तरी वर नमुद बागायत मिळकतीवर सदर मिळकतींचे वर्तमान मालक श्रीमती कलावती श्रीधर आठवले व इतर यांचे व्यतिरीक्त अन्य कोणाही इसमाचा संस्थांचा साठेकरार, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, गहाण, तारण, भाडेपट्टा, जाणे-येणेचा वहिवाटीचा मार्ग या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर कराव्यात. सदर मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :-१३/०९/२०२४

ॲड. कौस्तुभ उदय पवार
जिल्हा न्यायालय अलिबाग
मो. ९८५००३०२०४
ई-मेल: pawarskaustubh@gmail.com

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे मालेगाव तर्फे कोतलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक गणेश विठ्ठल बनकर यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ८ | ०-२४-५० | ०-८० |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १४/०९/२०२४

ॲड. समीर आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट हयू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

अर्जदार तर्फे ॲड. डी एन पाटील

### जाहीर नोटीस

**मुरुड येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

दि. चौ. अर्ज क्र. १४/२०२४
नि.७/ड

१) साजिदा इर्शाद खान,
तय ५५ वर्षे, धंदा - गृहीणी,
२) तरन्नुम इर्शाद खान,
वय ३६ वर्षे, धंदा - गृहीणी,
३) तब्बसुम इर्शाद खान, वय ३४ वर्षे, धंदा - गृहीणी.
४) शमा इर्शाद खान,
वय ३१ वर्षे, धंदा - गृहीणी, — अर्जदार
५) जुनेद इर्शाद खान,
वय २८ वर्षे, धंदा शिक्षण,
६) शाहीद इर्शाद खान,
वय २६ वर्षे, धंदा - शिक्षण,
७) शाहीन इर्शाद खान,
वय २४ वर्षे, धंदा शिक्षण,
नं. १ ते ७ सर्व रा. बोर्ली रामवाडी,
पो. बोर्ली मांडला,
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

विरुध्द

कोणीही नाही — सामनेवाला

अर्ज :- बाम्बे रेग्युलेशन ॲक्ट १९२७ VIII भाग २

आम्ही अर्जदार मे. कोर्टात नम्रपूर्वक विनंती अर्ज करतो की,

१) अर्जदार नं. १ यांचे पती व नं. २ ते ७ यांचे वडील पै इर्शाद हनीफ खान हे दिनांक १०.०५.२०२३ रोजी सौदी अरेबिया येथे मयत झाले असून त्यांचे दफन विधी व इतर धार्मिक कार्य हे त्यांचे राहते घरी म्हणजेच मौजे बोर्ली मांडला, ता. मुरूड या ठिकाणी दिनांक १७/०५/२०२३ रोजी करणेत आले आहे. पै. इर्शाद हनीफ खान यांचे पश्चात अर्जदार क्र. १ ते ७ हेच कायदेशीर वारस आहेत. अर्जदार नं. १ ही त्यांची पत्नी आहे व अर्जदार नं. २ ते ७ ही त्यांची मुले आहेत. पै. इर्शाद हनीफ खान यास अर्जदारांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

२) पै. इर्शाद हनीफ खान हे मौजे बोर्ली, ता. मुरुड, जि. रायगड येशील कायम रहीवाशी होते. पै इर्शाद हनीफ खान हे सौदी अरेबिया येथील अनाबीब कंपनी जुबैल या कंपनीत सुपरवायझर म्हणून काम करीत होते. पै. इर्शाद हनीफ खान हे सदर कंपनीत कामावर रुजू असताना कंपनीमध्येच मयत झाले होते. पै. इर्शाद हनीफ खान यांना त्यांचे वर नमुद कंपनीमार्फत मिळणाऱ्या रिटायरमेंटची रक्कम अर्जदार यांस मिळणेकरीता अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे कोर्टात दाखल केला आहे. अर्जदार यांना पै.इर्शाद हनीफ खान यांचे विम्याची रक्कम पै. इर्शाद हनीफ खान यांचे कायदेशिर वारस म्हणून त्यांचे नावे मिळणेंकरीता सदरचा अर्ज मे कोर्टात दाखल केला आहे

तरी या बाबत कोणतीही हरकत असल्यास त्याने सदर हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या में न्यायालयात समक्ष हजर राहून लेखी स्वरुपात दाखल करावी. जर मुदतीत तशी कोणतीही हरकत आली नाही तर सदरचा दाखला अर्जदार यांस देण्यांत येईल व त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही,

आज तारीख ०६/०९/२०२४ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिध्द केली.

सही/-
दिवाणी न्यायालय क. स्तर
क. लिपीक

सही/-
दिवाणी न्यायालय क. स्तर
सहाय्यक अधिक्षक

### रायगड बाजार
### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खालील कामांचा विचार करणेसाठी शनिवार, दिनांक २८-०९-२०२४ रोजी सकाळी ९-३० वाजता पी.एन.पी.एज्युकेशन सोसायटी, मध्यवर्ती कार्यालय, राऊतवाडी, वेश्वी, अलिबाग येथे मा. चेअरमन नृपाल जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भरणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**: सभेपुढील कामे :**

१) मागील दिनांक २९-०९-२०२३ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) ३१ मार्च २०२४ अखेर संपणाऱ्या वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल स्विकारणे.
३) ३१ मार्च २०२४ अखेरची जमाखर्च पत्रके (ताळेबंद, नफा-तोटा) अवलोकनी घेऊन त्यास मंजुरी देणे.
४) २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५) सन २०२४-२०२५ सालाकरिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
६) सन २०२३-२०२४ चा शासकीय हिशेब तपासणीसांचा तपासणी अहवाल अवलोकनी घेणे.
७) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता संस्थेचे सभासदांना पर्चेस रिबेट कुपन्स बाबत विचार करणे.
८) सन २०२४-२०२५ या वर्षांचे लेखापरीक्षण करण्यासाठी सहकार खाते पॅनलवरील लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे बाबत निर्णय घेणे.
९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे.

अलिबाग
दि. १४-०९-२०२४

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
प्रमोद ना.घासे
उपाध्यक्ष

सूचना : १) गणसंख्येच्या (कोरमच्या) अभावी सभा तहकूब राहिल्यास सदर सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर भरेल व त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४




● रोशन राजेंद्र आंद्रे, पेण फणसडोंगरी गोळीबार मैदान, ता. पेण.



● श्री. स्वप्निल शरद म्हात्रे, थळ-पालथी, संकल्पना- अनिल, स्वप्निल, सजावट- अनिल, गौरी, श्रीहान, श्रावणी, सुरज.



● अनंत नाईक, बांधण-पेझारी.




● नाईकांचा राजा-प्रताप वसंत नाईक, थळ पालथी



● मोठेभोम येथील रमेश केणी व प्रफुल्ल केणी यांच्या घरात प्रतिष्ठापना करण्यात आलेली ही गणरायाची मूर्ती. (सजावट-विराज केणी) (छायाचित्र - सार्थक म्हात्रे)



● श्री. भालचंद्र सरवणकर मु. किहीम, अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. कुणाल चव्हाण मु. किहीम, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



किहीम ग्रामपंचायत सदस्या नूतन थळे यांच्या घरी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)




● किहीम ग्रामपंचायत सदस्या निधी निनाद काठे यांच्या घरी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● किहीम ग्रामपंचायतीचे माजी सदस्य अजय म्हात्रे यांच्या घरातील लहान मुलांनी साकारलेल्या इकोफ्रेंडली गणपतीचे दर्शन व सजावटीचे कौतुक करताना सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



किहीम ग्रामपंचायत सदस्य संतोष किर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न गणेशमूर्तीचे दर्शन करताना सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● किहीम ग्रामपंचायत सदस्या जान्हवी जितेंद्र वाघे यांच्या निवासस्थानी गौरी गणपतीचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. संतोष नाईक मु. बामणसुरे आदिवासीवाडी, अलिबाग यांच्या घरी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड सोबत इतर आदिवासी लहान मुले. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



किहीम ग्रा.सदस्या जागृती जितेंद्र झेरंडे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड व मित्रपरिवार. (छायाचित्र :अब्दुल सोगावकर)



● सामाजिक कार्यकर्ते श्री. सुशांत पोसतांडेल मु. न्हावे-रोहा यांच्या निवासस्थानी गणरायाची सुबक मूर्ती सोबत सरपंच न्हावे नितीन डबीर. (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव, चणेरा)



● श्री. विनोद वसंत कवळे (आवास कवळे आळी) ता. अलिबाग यांचे घरी विराजमान गणपती बाप्पा.



● शिवसेना (उ.बा.ठा.) रोहा तालुका सहसंपर्क प्रमुख श्री. विनायक लक्ष्मण कटोरे मु.सोनखार-रोहा यांच्या निवासस्थानी असलेले गणेशमूर्ती. (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव, चणेरा)



● युवा कीर्तनकार ह.भ.प. आणि मूर्तीकार अजय साळावकर महाराज मु.न्हावे-रोहा यांच्या निवासस्थानी साकारलेली गणेश चित्र राम लक्ष्मण आणि शबरी. (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव, चणेरा)



● प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी/संवर्ग कर्मचारी संघटना तथा मा. अध्यक्ष कोळी समाज न्हावे, नवखार, सोनखार, दिव यांच्या निवासस्थानी मखरातील गणरायाची लोभस मूर्ती. (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव, चणेरा)



● माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव संगमेश्वर नगरातील शुभांगी राजेंद्र गोरेगावकर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र- सलीम शेख, माणगाव)

# येचुरींना लाल सलाम

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांचे निधन दुःखद आणि धक्कादायक आहे. आजच्या काळात ७२ हे काही जाण्याचे वय नाही. राजकारणात तर अजिबातच नाही. येचुरी यांचे गुरु हरकिशन सुरजित आणि ज्योती बसू हे ऐशी वा नव्वदीपार जाऊनही राजकारणात कमी-अधिक सक्रीय होते. येचुरी यांचे वागणे-बोलणे हे शेवटपर्यंत तरुणाला साजेसे उत्साही होते. एरवी कम्युनिस्ट चळवळीच्या प्रचंड संघर्षामध्ये बहुतांश नेत्यांचे चेहरे आणि व्यक्तिमत्व गंभीर होत जातात. पण येचुरींचे तसे झाले नाही. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करणाऱ्या सर्वांनी त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य व त्यांची विनोदी वृत्ती यांचा आवर्जून उल्लेख केला आहे. येचुरी हे मूळचे तेलुगु. त्यांचा जन्म एका ब्राह्मण कुटुंबात झाला. वडील आंध्र प्रदेशच्या सरकारी नोकरीत अभियंता होते. सीताराम किंवा सीतादा हे लहानपणापासून अतिशय हुशार होते. सीबीएसई बारावीच्या परिक्षेत ते पूर्ण देशात पहिले आले होते. पुढील शिक्षणासाठी ते दिल्लीत गेले. तेथेही कायमच त्यांनी आपला पहिला वर्ग सोडला नाही. अर्थशास्त्रातले सुवर्णपदक त्यांनी मिळवले होते. त्यांनी आयएएस व्हावे अशी त्यांच्या पालकांची इच्छा होती. तसे ते झालेही असते. पण १९७५ मध्ये इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीने सर्व चित्र बदलले. देशातील लोकशाहीला वाचवण्यासाठी हजारो तरुण चळवळीत उतरले. सीतादांसारखे अनेक जण भूमिगत झाले. नंतर त्यांना काही काळासाठी अटक झाली. १९७७ नंतर आणीबाणी उठली आणि ते स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. तोवर या पदावर केवळ बंगाली किंवा केरळी नेतेच निवडले जात. येचुरी हे या राज्यांपैकी नसलेले पहिले तरुण होते. याच काळात ते दिल्लीतील जवाहरलाल नेहरु विद्यापीठाच्या विद्यार्थी संघावर तीन वेळा अध्यक्ष म्हणून निवडून गेले. त्यांचा हा विक्रम आजही अबाधित आहे.

### तरुण वयातच मोठी भरारी

त्या काळात त्यांनी पीएचडी पूर्ण करावी म्हणून त्यांचे शिक्षक त्यांच्या मागे लागत होते. त्यांनी अर्थशास्त्रात करियर केले असते तर ते जागतिक बँकेचे अध्यक्षही झाले असते असे त्यांच्या मित्रांना वाटते. मात्र सीतादांना यापैकी कशाचाच मोह पडला नाही. वयाच्या ३३ व्या वर्षी म्हणजे १९८५ ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोमध्ये तर अवघ्या चाळिसाव्या वर्षी ते सेंट्रल कमिटीत दाखल झाले. हा मोठा बहुमान व तितकीच मोठी जबाबदारी होती. पण ज्येष्ठांनी त्यांच्यावर दर्शवलेल्या विश्वासाला ते जागले. १९९६ नंतर देशात जी आघाडी सरकारे आली त्यात कम्युनिस्ट पक्षांची भूमिका महत्वाची होती. त्यावेळी देवेगौडा सरकारसाठी किमान समान कार्यक्रमाचा मसुदा येचुरी यांनी केला होता. किंबहुना, तेथपासून ते आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी दिल्लीतील राजकारणात डाव्या आघाडीतर्फे अत्यंत कळीची भूमिका बजावली. ही भूमिका होती- भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी सर्व समविचारी पक्षांची एकजूट घडवण्याची. २००४मध्ये मनमोहनसिंगांचे पहिले सरकार ते अलिकडे इंडिया आघाडी स्थापन करण्यात येचुरींचे मोठे योगदान राहिले. प्रसंगी आपल्या पक्षातील कर्मठ नेत्यांचा विरोध पत्करुनही त्यांनी हे काम केले. कष्टकऱ्यांची क्रांती घडवून आणणं हा जगभरातल्या कोणत्याही कम्युनिस्टांचा मुख्य राजकीय कार्यक्रम असतो. अनेक राजकीय पक्ष असलेल्या संसदीय लोकशाहीत वावरणे किंवा निवडणुका लढवून सत्तेत येणे, इतरांसोबत आघाड्या करणे इत्यादी गोष्टी या मूळ राजकीय कार्यक्रमाचा भाग नाहीत. त्यामुळे १९४७ मध्ये स्वातंत्र्यानंतर भारतातील संसदीय लोकशाहीत कसे वावरावे हा कम्युनिस्टांपुढचा मोठा पेच होता. त्यातून सशस्त्र उठाव करण्याचा एक अयशस्वी प्रयत्न झाला. पण पुढे पक्ष सावरला व संसदीय निवडणुकांच्या व्यवस्थेत सामावला गेला. रुळला. तेव्हा काँग्रेस ही देशातील प्रमुख शक्ती होती. तिच्यासोबतचे संबंध कसे असावेत हा दुसरा मोठा पेच होता. त्यातून पक्षात फूट पडली. मात्र मार्क्सवादी कम्युनिस्टांनी बहुतांश काळात सातत्याने ठाम काँग्रेसविरोधी भूमिका घेतली.

### इंडिया आघाडीचे शिल्पकार

भाजपचा प्रभाव वाढल्यानंतर या भूमिकेत बदल करावा लागला. भाजप किंवा जातीयवादी शक्ती या देशातील लोकशाही नष्ट करतील हे कम्युनिस्टांनी ओळखले व त्यांनी डावपेचांचा भाग म्हणून काँग्रेससोबत जाण्याचे ठरवले. ही लाईन मांडणाऱ्यांमध्ये येचुरी हे प्रमुख होते. कम्युनिस्ट म्हणून मार्क्सवाद-लेनिनवादाची कास त्यांनी कधीही सोडली नाही. पण म्हणून विरोधी विचारांच्या नेत्यांना वा पत्रकारांना त्यांनी शत्रू मानले नाही. त्यांच्याशीदेखील सहज व हसतखेळत संवाद करण्याची कला येचुरींमध्ये होती. किंबहुना, अगदी शेवटपर्यंत सर्व पक्षातील नेत्यांशी त्यांचे चांगले संबंध होते. भाजपच्या विरोधात इंडिया आघाडी उभी करण्यात येचुरी यांचा मोठा वाटा होता. एकेकाळी इंदिरा गांधींच्या काँग्रेसविरुध्द ते लढले. इंदिराजींनी जेएनयूच्या कुलपतीपदाचा राजीनामा द्यावा यासाठी त्यांनी आंदोलन केले. याबाबतचा इंदिराजींच्या घराबाहेरचा एक फोटो सर्वत्र प्रसिध्द झाला आहे. त्यात येचुरी आपल्या मागण्या जाहीरपणे वाचून दाखवत आहेत आणि शेजारी उभ्या राहून खुद्द इंदिराजी शांतपणे त्या ऐकून घेत आहेत. दोन दिवसात श्रीमती गांधींनी तेव्हा राजीनामा दिला होता. मात्र त्याच येचुरी यांचे त्यांच्या सूनबाई सोनिया गांधी व नातू राहुल गांधी यांच्याशी अत्यंत जवळचे संबंध होते. राहुल यांचे तर ते गुरु असल्याचे सध्या विनोदाने म्हटले जाते. हे होऊ शकले कारण येचुरींची लढाई कोण्या व्यक्तीच्या विरोधातली नव्हती. विचारसरणी आणि व्यवहार्य राजकारण यांची उत्तम सांगड ते घालू शकत होते. २०१५ मध्ये ते पक्षाचे सर्वोच्च नेते झाले. मोदींना शह देण्यासाठी आपण काँग्रेससोबत आघाडी करायला हवी असे त्यांचे मत होते. पण पक्षातील केरळी गटाने त्यांचा हा प्रस्ताव हाणून पाडला. येचुरी यांचे मोठेपण असे की, त्यांनी बंडाळी केली नाही. पक्षशिस्त मोठी मानली. आघाडी न करण्याचा पक्षाचा निर्णय, स्वतः सरचिटणीस असूनही, मान्य केला. पुढे २०२४ मध्ये पक्षाला येचुरींचे म्हणणे मान्य करावे लागले. त्याबद्दलही त्यांनी शेखी मिरवली नाही. या निष्ठावान कॉम्रेडला कृषीवलतर्फे अखेरचा लाल सलाम.

विचार

# आघाड्यांच्या राजकारणाचा चाणक्य

अजय तिवारी



एक कुशाग्र बुद्धीचा तरुण..देशात बारावीत पहिला आलेला...विद्यापीठातही चमकलेला... आणीबाणीनंतर डाव्यांच्या चळवळीत सहभागी होऊन देशपातळीवर नेतृत्व केलेला आणि भारतातील शेतकरी, आदिवासी, भूमिहीन, तरुण, कामगार यांच्या हक्कांसाठी लढणारा अशी ओळख असलेला नेता म्हणून सीताराम येचुरी यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने दुर्बळांचा आवाज शांत झाला. येचुरी हे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (सीपीआय-एम) सरचिटणीस होते. ज्योती बसू आणि बुद्धदेव भट्टाचार्य यांसारख्या डाव्या व्यक्तींनंतर येचुरी हे भारतीय डाव्या चळवळीचे निर्विवाद आधारस्तंभ म्हणून उदयास आले. येचुरी हे प्रभावी आणि उत्कृष्ट वक्ते म्हणून संसदेत ओळखले जात होते, तसेच एक हुशार आणि तल्लख तर्कशास्त्रकार म्हणून सर्व पक्षांच्या नेत्यांनी त्यांचा आदर केला होता. घटनात्मक आणि राजकीय बाबींवर त्यांची पकड असल्याने ते सत्ताधारी पक्षासाठी आव्हानात्मक विरोधक बनले. सरकारच्या उत्तरदायित्वाबाबत स्पष्टता, विश्वास आणि लोकशाहीप्रती असलेली सखोल जबाबदारी यामुळे त्यांनी संसदेत सत्ताधारी पक्षाला कायम विचार करायला भाग पाडले. आपल्या आयुष्यात त्यांनी डाव्या चळवळीला नवे आयाम दिले आणि भारतीय राजकारणात आपली खास ओळख निर्माण केली. येचुरी यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील एका युगाचा अंत झाला आहे ज्याने समाजवाद, समता आणि सामाजिक न्यायासाठी अनेक दशके काम केले. तेलुगू ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या सीताराम यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठात आल्यानंतर राजकीय प्रवासाला सुरुवात केली. त्यांचे वडील सर्वेश्वर सोमयाजुला येचुरी एक अभियंता आणि आई कल्पकम येचुरी सरकारी अधिकारी होत्या. येचुरी यांनी 'सीबीएसई बोर्डा'च्या बारावीच्या परीक्षेत नवी दिल्ली येथील प्रेसिडेंट इस्टेट स्कूलमधून देशात प्रथम क्रमांक मिळवला आणि सेंट स्टीफन कॉलेज, दिल्ली येथून अर्थशास्त्रात बी.ए. (ऑनर्स.) पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी 'जेएनयू'मधून अर्थशास्त्रात एम.ए. केले. तिथून त्यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. १९७० च्या आणीबाणीच्या काळात येचुरी 'जेएनयू'मध्ये विद्यार्थी नेता म्हणून उदयास आले. ते 'एसएफआय' या विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष झाले. पश्चिम बंगाल आणि केरळ वगळून अन्य राज्यातला पहिला नेता होण्याचा मान त्यांना मिळाला.

१९७५ मध्ये आणीबाणीच्या काळात त्यांना अटक झाली. येचुरी यांची राजकीय कारकीर्द या कठीण काळात आकाराला आली. त्यामुळे त्यांना सार्वजनिक चिंता आणि डाव्या राजकारणाची सखोल माहिती मिळाली. २०१५ मध्ये ते माकपचे सरचिटणीस बनले. तिथून त्यांनी पक्षाच्या आत आणि बाहेर अनेक आव्हानात्मक परिस्थितींचा सामना केला. येचुरी यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची विचारधारा टिकवून जनसंवाद वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी नेहमीच डाव्या विचारसरणीला चिकटून राहून, समाजवाद, समता आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांवर सातत्याने भर दिला. कामगार, शेतकरी, आदिवासी आणि समाजातील वंचित घटकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी आवाज उठवला. येचुरी यांनी भारतीय राजकारणात लोकशाही मूल्यांना सर्वोच्च मानले आणि आणीबाणीच्या काळापासून आयुष्यभर या मूल्यांसाठी लढा दिला. संसदेच्या आत आणि बाहेर लोकशाही प्रक्रियेच्या रक्षणासाठी त्यांनी नेहमीच आवाज उठवला.

येचुरी यांनी केवळ भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही डाव्या चळवळीला नवी उंची दिली. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय मंचांवर भारतीय डाव्यांचे प्रतिनिधित्व केले आणि जागतिक स्तरावर समाजवादाचा पुरस्कार केला. भारतीय राजकारणात धर्मनिरपेक्ष आणि पुरोगामी शक्तींना बळकट करण्यासाठी येचुरी यांनी अनेक प्रसंगी काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांसोबत व्यापक युती करण्याच्या धोरणावर जोर दिला आहे. भारतीय डाव्या राजकारणात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली असली, तरी त्यांच्या नेतृत्वात पक्षाला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. येचुरी यांच्या नेतृत्वाच्या काळात सीपीआय(एम) चा प्रभाव हळूहळू कमी होत गेला. विशेषतः पश्चिम बंगाल आणि त्रिपुरासारख्या राज्यांत तर सत्ताही गेली. येचुरींच्या सर्व प्रयत्नांनंतरही पक्ष आपल्या बालेकिल्ल्यातही कमजोर होत गेला. ते पक्षाचे पुनरुज्जीवन करू शकले नसल्याची टीका त्यांच्यावर झाली. सीपीआय(एम) मधील दोन गटांमध्ये नेहमीच संघर्ष होता. एक पुरोगामी गट जो काँग्रेस आणि इतर पक्षांशी युती करण्यास अनुकूल होता आणि कट्टर डावा गट जो तत्त्वांशी तडजोड करण्याच्या विरोधात होता. ही दुफळी संपवण्यात येचुरी यशस्वी झाले नाहीत. त्यांनी काँग्रेससोबत व्यापक विरोधी आघाडी स्थापन करण्याचा प्रयत्न केला;परंतु ही रणनीती पश्चिम बंगालमध्ये यशस्वी झाली नाही. २०१६ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि सीपीआय (एम) यांची युती सपशेल अपयशी ठरली आणि त्यांच्या राजकीय कुशाग्रतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. त्यांना राष्ट्रीय स्तरावर पक्षाचा विस्तार करण्यात यश आले नाही. पक्षाचा प्रभाव प्रामुख्याने काही राज्यांपुरता मर्यादित राहिला आणि राष्ट्रीय स्तरावर तो कमकुवत झाला. डाव्या विचारसरणीविषयी तरुणांची आवड कमी झाली आणि पक्षाचे नेतृत्व वाढत्या वयाच्या नेतृत्वापुरते मर्यादित राहिले. त्यांना भारतीय राजकारणात डाव्या चळवळी कायम ठेवण्यासाठी सतत संघर्ष करावा लागला आणि काही वेळा त्यांना धोरणात्मक फेरबदल करावा लागला. येचुरी यांच्या नेतृत्वाखालील सर्वात मोठे आव्हान भारतीय राजकारणातील डाव्या पक्षांची कमी होत चाललेली ताकद वाचवणे हे होते. पश्चिम बंगाल आणि केरळसारख्या राज्यांमध्ये, जिथे एकेकाळी डाव्या आघाडीचे वर्चस्व होते, त्यांचा प्रभाव कमी झाला. पश्चिम बंगालमध्ये २०११ मध्ये ३४ वर्षांच्या शासनानंतर पडलेले डावे सरकार या आव्हानाचे सर्वात मोठे उदाहरण होते.

भारतीय राजकारणात, आर्थिक उदारीकरण आणि खासगीकरणाच्या वाढत्या प्रभावाने डाव्या विचारसरणीसमोर नवीन आव्हान उभे केले आहे. येचुरी यांना मार्क्सवादी तत्त्वे आणि आर्थिक वास्तविकता यांचा समतोल साधावा लागला. त्यांना अनेकदा विचारधारा आणि रणनीतीवरून सीपीआय(एम) मध्ये मतभेदांचा सामना करावा लागला. पक्षाचा एक पुराणमतवादी दृष्टिकोन ठेवण्यास अनुकूल होता, तर येचुरीसारखे नेते काँग्रेससारख्या इतर पक्षांशी युती करण्याचा सल्ला देत होते. भारतातील झपाट्याने बदलणाऱ्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत तरुणांना डाव्या विचारसरणीकडे आकर्षित करणे येचुरी यांच्यासाठी मोठे आव्हान होते. वाढती बेरोजगारी, शिक्षणातील घसरण, राजकीय उदासीनता असे मुद्दे असूनही नव्या पिढीला आकर्षित करण्यात त्यांना यश आले नाही. जातीयवाद आणि धर्मनिरपेक्षतेच्या मुद्द्यावर सातत्याने लढा देत असताना, येचुरी यांना एकीकडे भाजपची वाढती सत्ता आणि दुसरीकडे अल्पसंख्याक समुदायांच्या सुरक्षा आणि हक्कांचे संरक्षण या आव्हानाचा सामना करावा लागला. विरोधी पक्षात असताना येचुरी आणि डाव्या पक्षांना संसदेत बहुमत असलेल्या सरकारसमोर त्यांची धोरणे आणि विचारसरणी प्रभावीपणे मांडता न आल्याने अनेकदा आव्हान वाटले. आर्थिक धोरणे असोत, शेतकऱ्यांचे प्रश्न असोत किंवा परराष्ट्र व्यवहार असोत; विरोधी पक्षात राहिल्याने त्यांना प्रभावी निर्णय घेण्यात अडचणी येत होत्या. भारत आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या आर्थिक आणि धोरणात्मक संबंधांनी डाव्या पक्षांसमोर आव्हान उभे केले आहे. येचुरी यांनी नेहमीच भारताच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला. येचुरींचे राजकारण आणि त्यांच्या योगदानाचे त्यांचे समर्थक आणि टीकाकार दोघेही कौतुक करतात. समानता, न्याय आणि लोकशाहीसाठी आवश्यक असलेल्या मूल्यांचे प्रतीक त्यांचे जीवन होते. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व त्यांनी अशा वेळी केले, जेव्हा भारतीय राजकारणातील या पक्षाचा दबदबा कमी झाला होता.

'सीपीएम'चे संसद आणि विधानसभेतील प्रतिनिधित्व कमी झाले असले, तरी देशाचा अजेंडा ठरवण्यात 'सीपीएम'ची भूमिका महत्त्वाची आहे. १९७७-७८ मध्ये ते 'जेएनयू' विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष झाले. या काळात डाव्या विचारसरणीला या विद्यापीठ परिसरात पूर्णतः फोफावण्याची संधी मिळाली. देशातील डाव्या विचारांचे दुसरे सर्वात मोठे नाव असलेल्या प्रकाश करात यांच्या मदतीने त्यांनी 'जेएनयू' हे डाव्या विचारांच्या अभ्यासाचे आणि सादरीकरणाचे प्रमुख केंद्र बनवले. येचुरी यांनी सलग तीन वेळा (२००५-१५) पक्षाचे सरचिटणीस राहिलेल्या करात यांच्याकडून पक्षाची सूत्रे हाती घेतली. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीनंतर देशाच्या राजकारणात पुन्हा एकदा आघाड्यांचे पर्व सुरू झाले. त्या वेळी येचुरी यांनी संयुक्त आघाडी सरकारच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावली. कारण त्या निवडणुकीत डाव्यांचे ५० हून अधिक सदस्य निवडून आले आणि संसदेत पोहोचले. त्यांची प्रतिमा भारतीय जनता पक्षाचे कट्टर विरोधक म्हणून राहिली. येचुरी यांच्याच सक्रियतेमुळे आणि मध्यस्थीमुळे गेल्या लोकसभा निवडणुकीपूर्वी 'इंडिया' आघाडीची स्थापना झाली. लोकसभा निवडणुकीत भाजपला मोठा धक्का देणारा भाजपविरुद्ध फॉर्म्युला लागू करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. हा फॉर्म्युला प्रत्यक्षात आल्यानंतरच 'एनडीए' ३५१ वरून २९२ वर आणि भाजप ३०३ वरून २४० वर आला, तर 'इंडिया' आघाडीने २३२ चा आकडा गाठला. ते 'इंडिया' आघाडीच्या ताकदीतील एक प्रमुख दुवा होते. येचुरी २२ सप्टेंबर २०२३ रोजी यांनी पाटण्यात 'इंडिया' आघाडीची बीजे रोवली. तेव्हा त्यांनी एक अतिशय गंभीर गोष्ट सांगितली. त्यानंतर संपूर्ण राजकारणाची दिशाच बदलली. भारतीय जनता पक्षासोबत लढायचे असेल तर 'एक विरुद्ध एक' हे सूत्र पाळावे लागेल, असे सूत्र त्यांनी दिले. त्यानंतर त्यांनी लालू यादव यांची पाटणा येथे भेट घेतली. एक तासाच्या बैठकीत 'इंडिया' आघाडी मजबूत करण्यावर चर्चा झाली. येचुरी यांनी सांगितले होते, की अशी व्यवस्था करावी, की एका जागेवर 'इंडिया' आघाडीचा एकच उमेदवार उभा राहावा. आघाडीतील पक्षांना सन्मानाने जागा मिळाव्यात. लालू यादव यांना भेटण्यापूर्वी येचुरी यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचीही भेट घेऊन 'एक विरुद्ध एक' फॉर्म्युल्यावर चर्चा केली होती; परंतु नंतर नितीशकुमार 'इंडिया' आघाडीतून बाहेर पडले.

येचुरी आणीबाणीतील तुरुंगवास भोगून परत आल्यावर देशात लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी भूमिगत झाले. त्यांच्या आयुष्यातील हा सर्वात महत्त्वाचा 'टर्निंग पॉइंट' होता. या वेळीच त्यांची राजकीय सक्रियता आणि साम्यवादी विचारसरणीची बांधिलकी वाढली. 'जेएनयू'मधून पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी येथून अर्थशास्त्रात पीएच.डी करण्यासाठी प्रवेश घेतला; परंतु १९७५ मध्ये आणीबाणीच्या काळात त्यांना अटक झाली. त्यामुळे त्यांची पीएच. डी. अर्धवट राहिली आणि त्यांचे 'डॉक्टर' होण्याचे स्वप्न अधुरे राहिले. संसदेच्या वरिष्ठ सभागृहात आपल्या बोलण्याच्या क्षमतेने आणि वास्तववदर्शी भाषण शैलीने विरोधकांनाही त्यांचा मुद्दा पटत असे. २००५ मध्ये ते प्रथमच पश्चिम बंगालमधून राज्यसभेचे सदस्य झाले. ते १८ ऑगस्ट २०१७ पर्यंत राज्यसभेवर राहिले. या काळात त्यांनी लोकहिताचे अनेक मुद्दे संसदेत मांडले. डॉ. मनमोहन सिंग सरकारच्या कार्यकाळात जुलै २००८ मध्ये भारत आणि अमेरिका यांच्यात नागरी अणु करार झाला, त्या काळात येचुरी चर्चेत होते. सिंग या कराराबाबत 'सीपीएम'च्या अनेक अटी मान्य करायला तयार होते; परंतु करात हे मान्य करायला तयार नव्हते. ८ जुलै २००८ रोजी करात यांनी सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेण्याची घोषणा केली. येचुरी हे राजकारणी तसेच सामाजिक कार्यकर्ते, अर्थतज्ज्ञ, पत्रकार आणि लेखक होते. काँग्रेस नेते पी. चिदंबरम् यांच्यासोबत त्यांनी १९९६ मध्ये संयुक्त आघाडी सरकारसाठी समान किमान कार्यक्रम तयार केला. ते बराच काळ वृत्तपत्रांमध्ये स्तंभलेखन करत होते. त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. त्यात 'लेफ्ट हँड ड्राइव्ह', 'व्हॉट इज हे हिंदु राष्ट्र', 'पॉलिटिक्स ऑफ हेट' (हिंदीमध्ये), '२१व्या शतकातील समाजवाद' या पुस्तकांचा समावेश आहे. त्यांनी 'डायरी ऑफ फ्रीडम मूव्हमेंट', 'द ग्रेट रिव्हॉल्टः अ लेफ्ट अप्रायझल' आणि 'ग्लोबल इकॉनॉमिक क्रायसिस - अ मार्क्सिस्ट पर्सपेक्टिव्ह' या ग्रंथांचे संपादनही केले. येचुरी यांनी १९७७ मध्ये जवाहरलाल नेहरू विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर इंदिरा गांधींनी संस्थेच्या कुलपतिपदाचा राजीनामा द्यावा, या मागणीसाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने केली. इंदिरा गांधी स्वतः येचुरी यांचे म्हणणे ऐकायला आल्या होत्या. त्यांनी त्यानंतर कुलपतिपदाचा राजीनामा दिला. येचुरी यांचे महत्त्व डाव्यांना फार कळले नाही.

आजकाल

# रस्ते अपघातात दरवर्षी दीड लाख मृत्यू होतात

पोलीस विभागांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय 'भारतातील रस्ते अपघात'संबंधी वार्षिक अहवाल प्रकाशित करते. त्यानुसार देशात २०२० मध्ये ३ लाख ७२ हजार १८१ अपघात झाले. २०२१ मध्ये ४ लाख १२ हजार ४३२ तर २०२२ मध्ये ४ लाख ६१ हजार ३१२ अपघातांची नोंद झाली. अपघातांमध्ये मृत्यूचे प्रमाण चिंताजनक आहे. २०२२ मध्ये तब्बल १ लाख ६८ हजार ४९२ लोकांना अपघातांमध्ये प्राण गमवावे लागले आहेत. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे देखील मोठ्या प्रमाणात अपघात झाले आहेत. देशात २०२० मध्ये खड्ड्यांमुळे ३ हजार ५६४, २०२१ मध्ये ३ हजार ६२५ तर २०२२ मध्ये ४ हजार ४४६ अपघात घडल्याची माहिती देण्यात आली आहे. महाराष्ट्रात २०२० मध्ये २४ हजार ९७१, २०२१ मध्ये २९ हजार ४७७ आणि २०२२ मध्ये ३३ हजार ३८३ अपघात झाले आहेत.

अतिवेगाने वाहन चालवणे, निष्काळजीपणे वाहन चालवणे, दारू पिऊन वाहन चालवणे तसेच वाहतूकविषयक नियमांचे पालन न करणे यांसह अनेक घटक रस्ते अपघातांसाठी कारणीभूत मानले जातात. २०२२ मध्ये एकूण अपघातांपैकी ७२.३ टक्के अपघात केवळ वाहन वेगाने चालविल्यामुळे झाले आहेत. वेगाने वाहन चालविल्यामुळे ७१.२ टक्के मृत्यू आणि ७२.८ टक्के लोक जखमी झाले आहेत. २०२१ च्या वेगाने वाहन चालविण्याच्या घटनांची तुलना केल्यास एकूण अपघातांमध्ये १२.८ टक्के, मृत्यूंमध्ये ११.८ टक्के आणि जखमींच्या संख्येत १५.२ टक्के एवढी वाढ झाली आहे. चुकीच्या दिशेने वाहन चालविणे हे अपघाताचे दुसरे मोठे कारण असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे; ज्यामुळे झालेल्या अपघातांची संख्या ४.९ टक्के एवढी दाखविण्यात आली आहे.

स्टॉकहोम करारातील बांधिलकीनुसार, सरकारने २०३० पर्यंत रस्त्यावरील मृत्यू आणि जखमींचे प्रमाण ५० टक्क्यांहून कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने '४ ई' म्हणजे एज्युकेशन (शिक्षण), इंजिनिअरिंग (अभियांत्रिकी) (रस्ते आणि वाहने दोन्ही), एन्फोर्समेंट (अंमलबजावणी) आणि इमर्जन्सी केअर (आपत्कालीन सेवा) असा दृष्टिकोन स्वीकारला आहे. रस्त्यांचा वापर करणाऱ्यांची वर्तणूक, रस्त्यांच्या पायाभूत सुविधा, वाहनांचे मापदंड, वाहतूक नियमांची अंमलबजावणी तसेच अपघातांना प्रतिबंध करण्यात तंत्रज्ञानाची भूमिका अशा विविध पैलूंवर देखील मंत्रालय काम करत आहे. त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार अशा दोघांच्याही अखत्यारीतील सर्व संस्थांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मते भारतात युद्ध, दहशतवाद आणि नक्षलवादापेक्षा रस्ते अपघातात जास्त मृत्यू होतात. देशात दरवर्षी ५ लाख रस्ते अपघात होतात, ज्यामध्ये १.५ लाख लोकांचा मृत्यू होतो आणि ३ लाखांवर लोक जखमी होतात. यामुळे देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाचे (जीडीपी) तीन टक्के नुकसान होते. अपघातांसाठी अनेकदा चालकांना जबाबदार धरले जाते, परंतु काही वेळा रस्ता अभियांत्रिकी चुकते. अपघात कमी करण्यासाठी सर्व महामार्गांची सुरक्षा पडताळणी आणि लेनची शिस्त पाळणे आवश्यक आहे. रस्ते अपघातात जखमी झालेल्या लोकांचे प्राण वाचवण्यासाठी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय रुग्णवाहिका तसेच त्यांच्या चालकांसाठी नवीन नियम बनवत आहे.

रस्ते सुरक्षेबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यासाठी मंत्रालयाने समाज माध्यमे, इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांतून प्रचार आणि जनजागृती मोहीम राबवणे, तसेच जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि रस्ते सुरक्षा बळकट करण्यासाठी दरवर्षी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा माह/सप्ताह पाळण्यात येत आहे. मंत्रालयाअंतर्गत सर्व रस्ते यंत्रणांच्या अधीक्षक अभियंता किंवा समकक्ष स्तरापर्यंतच्या तांत्रिक अधिकाऱ्यांसाठी रस्ते सुरक्षा लेखापरीक्षक अभ्यासक्रम अनिवार्य करण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्गांवर अपघातप्रवण क्षेत्र ओळखणे आणि ते दुरुस्त करण्यास प्राधान्य दिले जात आहे.

रस्ते वाहतूक मंत्रालयाने वाहनातील १५ फेब्रुवारी २०२२ च्या अधिसूचनेद्वारे मोटारसायकल चालवताना किंवा त्यावरून नेताना चार वर्षांखालील मुलांसाठी सुरक्षा उपायांशी संबंधित निकष निर्धारित केले आहेत. तसेच सेफ्टी हार्नेस, क्रॅश हेल्मेटचा वापर करण्याची सूचना केली असून वेग मर्यादा ताशी ४० किमी निश्चित केली आहे. रस्ते अपघात रोखण्यासाठी वास्तव वेळात माहितीचे विश्लेषण करण्यासाठी अपघातविषयक तपशीलवार इलेक्ट्रॉनिक अहवाल (ई-डीएआर) आणि स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रांची उभारणी यांसारखे उपक्रम देखील हाती घेण्यात येत आहेत.

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१४ सप्टेंबर**

**१८६७ :-** वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक, अभ्यासू धर्मप्रचारक व ग्रंथसंपादक विष्णुबुवा जोग यांचा जन्म. 'तुकोबारायांच्या अभंगाच्या सार्थ गाथा', 'सार्थ अमृतानुभव', 'हरिपाठ सार्थ' तसेच वारकरी संप्रदायाची भजन - मालिका यांना जोग यांनी पुस्तकरुप दिले. **१९०१:-** लेखक, विचारवंत शिक्षणतज्ञ यमुनाबाई हिर्लेकर यांचा जन्म. मुंबई विद्यापीठातून एम ए ची पदवी संपादन करणाऱ्या त्या पहिल्या महिला. पारतंत्र्याच्या काळात जर्मनीत जाऊन तेथील शिक्षण पध्दतीचा अभ्यास करुन 'एज्युकेशन इन जर्मनी', 'युनिर्व्हसिटी इन जर्मनी' या सारखी पुस्तके लिहिली. तसेच 'नव्या जगात', 'विचारधारा' ही वैचारिक स्वरुपाची तर 'भक्तीवेल' हा आध्यात्मिक काव्यसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला. **१९२३ :-** लेखक, स्वातंत्र्यसेनानी, राजकीय अनुवादक मोरेश्वर गणेश तपस्वी यांचा जन्म, 'असे होते गांधीजी', 'अहिल्याबाई' ह्या चरित्रवजा पुस्तकांसह 'अंतरिक्षातील भारत' हे विज्ञानविषयक, 'कामयनी' हिंदी महाकाव्याचा अनुवाद, 'थरार' ही कादंबरी, 'नद्यांची कहानी', 'स्वातंत्र्याची कहाणी' हे बालसाहित्य, 'संसदेची सत्पती' ह्या ग्रंथातून भारतातील पहिला सात लोकसभांचा आढावा अशी साहित्य संपदा. **१९२८:-** पंचवीसहून अधिक आवृत्या निघालेले 'अन्नपूर्णा' हे पाककलाविषयक पुस्तक लिहिणाऱ्या बर्वे यांचा जन्म. 'चायनीज पदार्थ', 'मांसाहारी इच्छाभोजन' ही त्यांची अन्य मंगला अच्युत पुस्तके, मुलांच्या अंगी मुलींचे गुण बाणवा' हा त्यांचा लेखही उल्लेखनीय आहे. **१९३० :-** वैद्यकालीन आहार आणि आरोग्यविषयक ग्रंथकर्ते गंगाधर बाळकृष्ण परांजपे यांचे निधन. बडोद्याच्या गायकवाड सरकारच्या ग्रंथमालेसाठी 'आहार मीमांसा व रोगाची शुश्रूषा आणि आरोग्यशास्त्र' हे ग्रंथ लिहिले. त्यातील 'आहार - मीमांसा' हा आहारशास्त्राचे विस्ताराने विवेचन करणारा मराठीतला पहिलाच ग्रंथ म्हणून महत्त्वपूर्ण आहे. **१९३० :-** शाळा-महाविद्यालयीन काळातच लेखन करणाऱ्या कथालेखिका सुधा मुकूंद नरवणे याचा कथालेखन प्रसिध्द. जन्म. अनेक नियतकालिकांतून 'मरालिका', 'दोलाचल', 'सरणम', 'गच्छामि', 'इंद्रधनू' हे कथासंग्रह प्रकाशित तसेच 'व्हाईट मुघल्स', 'बॉर्न कन्फ्यूज्ड', 'मनस्विनी', 'कातर वेळी', 'विसरु दे मला', 'लामण दिवा', 'कुठून कुठे', 'टोकियोच्या नभांगणा तील चमकत्या तारका' ही इतर पुस्तके. अशी साहित्य संपदा प्रसिध्द. **१९३२ :** कथालेखिका, आकाशवाणी पुणे केंद्रावरील वृत्त निवेदिका सुधा मकुंद नरवणे यांचा जन्म. ह्यांचे इंद्रधनु', 'दोलाचाल', 'मरालिका सरणं गच्छामि' हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. **१९३३ :-** आत्मचरित्रकार शरदचंद्र अवचट यांचा जन्म. 'पावला पुढलं आभाळ' या नावाने त्यांचे आत्मचरित्र प्रसिध्द झाले आहे.. **१९५३ :-** साहित्यिक प्रा. डॉ. राजन जयस्वाल यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'कानेटकरांची नाट्यसृष्टी', 'वाङ्मयातील वैचारिकता' हे समीक्षात्मक ग्रंथ. 'आलगी' हा प्रतिनिधिक कथासंग्रह, 'चौपाट' हा मराठी गुजराती असा एकमेव द्वैभाषिक काव्यसंग्रह. 'चौकार', 'चऊक' हा चारोळी काव्यसंग्रह तसेच डॉ. हरिश्चंद्र बोरकर साहित्य सूची', 'एका फुलाची बाग' हा ग्रंथ. **१९७३ : -** समीक्षक, संपादक भालचंद्र लक्ष्मण पाटणकर यांचे निधन. समीक्षात्मक लेखन करणाऱ्या भालचंद्रजींनी 'बालकवींची समग्र कविता' याचे संपादन केले. **१९९२:-** लेखक, इतिहास संशोधक, संस्कृत भाषेचे जाणकार अ. ज. राजुरकर यांचे निधन. 'चंद्रपुरचा इतिहास' हा संशोधन पर ऐतिहासिक ग्रंथ त्यांनी लिहिला आहे. **१९९८:-** कथा, कादंबरीकार, बालसाहित्यिक रामकृष्ण जोशी यांचे निधन. 'नवे ते हवे', 'आशा निराशा', 'दिवेलागणी' हे लघुकथासंग्रह. 'वादळ संपले', 'अंधारातील किरण', 'ऋणानुबंध' या सामाजिक विषयाच्या कादंबऱ्या. 'स्विकार' हे नाटक आणि 'आजोबा लवकर या', 'किसनमामाची शेंडी' हे बालसाहित्य त्यांच्या नावावर आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४


● चिरनेर कातळपाडा येथील काशिनाथ बुधाजी म्हात्रे यांच्या निवासस्थानात विराजमान झालेली गणरायाची सुंदर, सुबक गणेशमूर्ती. (छायाचित्र : सार्थक म्हात्रे)


● श्री विनोदशेट एकनाथ पाटील व परिवार, चोरगुंडी यांचा इकोफ्रेंडली गणपती सजावट श्री साईबाबा मंदिर शिर्डी द्वारकामाई देखावा.


● मुरूड तालुक्यातील नांदगाव येथील सामाजिक कार्यकर्ते महेंद्र चौलकर यांच्या निवासस्थानी विराजमान झालेली गणरायाची आकर्षक मंगलमूर्ती व सोबत द्रौपदी वस्त्राहरण देखावा आकर्षण ठरली आहे. (छायाचित्र : राजीव नेवासेकर)


● तेजस मधुकर घरत यांच्या तुर्भेगाव नवी मुंबई येथील निवासस्थानात विराजमान झालेली गणरायाची सुंदर सुबक, शाडू मातीची गणेशमूर्ती (मूर्तीकार : प्रसाद चौलकर) (छायाचित्र : सार्थक म्हात्रे)


● मोहन कृष्णा पाटील मु. सागाव-तळवली, मारूती मंदिराच्या बाजूला पत्रावळीच्या पानापासून इको फ्रेंडली गणपती डेकोरेशन


● श्री. मोहन सुडकु खंडेराव पाडा थेरोंडा यांचे निवासी गणरायाची मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)


● कु. अनिकेत अनंत म्हात्रे चौलमळा यांनी साकारलेला गणरायाचा मनमोहक देखावा. (छायाचित्र : सुरेश खडपे)


● मुक्त पत्रकार व लेखक दिनेश तुरे वावे यांचे घरी गणरायाची मनमोहक मूर्ती. (छायाचित्र : सुरेश खडपे)


● मा. महाराष्ट्र राज्य शेकाप महिला आघाडी प्रमुख मानसीताई संतोष म्हात्रे यांचे निवासी गौरी गणपतीची मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)


● श्री. चित्तरंजन नाईक वेश्वी दळीनगर यांचे निवासी गणरायाची मनमोहक मूर्ती. (छायाचित्र : सुरेश खडपे)


● सौ. संगीता सतीश कुलकर्णी, रेवदंडा यांचे घरी गौरी गणपतीची आकर्षक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)

## उरणमध्ये बनावट नोटांचा सुळसुळाट

। उरण । वार्ताहर ।

उरणमध्ये बनावट नोटांचा सुळसुळाट झाला आहे. कोणाकडून तरी आलेली बनावट नोट सर्वसामान्य नागरिकांची डोकेदुखी ठरत आहे. उरणमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून बनावट नोटा आढळण्याचे प्रमाण वाढले आहे. या बनावट नोटा वापरणारी टोळी उरण परिसरात फिरत आहे. सुटे पैसे मागण्याचा बनाव करून खोटी नोट देऊन फसवले जाते. याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली असून, अधिकृत माहिती मिळत नाही.

ऐन गणेशोत्सवात बनावट नोटा मोठ्या प्रमाणात वठविल्या जात आहेत. विशेष म्हणजे, गणेशोत्सवात जागरण करताना सुरू असलेल्या पत्त्याच्या खेळात मोठ्या प्रमाणात बनावट नोटांचा वापर केला जात असल्याचे समजते. दहा हजारांच्या खऱ्या नोटा दिल्यानंतर १ लाख बनावट नोटा मिळत असल्याची चर्चा उरणच्या जनतेत सुरू आहे. याला वेळीच आळा घातला नाही तर लाखो रुपयांच्या बनावट नोटा चलनात येऊन व्यापारी व सर्वसामान्य जनतेची फसवणूक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामध्ये राजकीय पक्षाचे पदाधिकारी सामील असल्याने त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचे बोलले जात आहे.

बनावट नोट सामान्य माणसाला लगेच ओळखू येत नाही. बँकेमध्ये पैसे भरण्यासाठी गेल्यानंतर अनेकांना तुमची ही नोट बनावट आहे, असे अधिकारी सांगतात. त्या नोटेवर लाल रंगाच्या पेनने फुली मारून संबंधिताचे नाव, पत्ता घेऊन बनावट नोट जमा करण्याचे काम बँकेचे अधिकारी करतात. राष्ट्रीयीकृत बँकेतील अधिकारी तर अशी नोट फाडूनच टाकतात. ग्राहकाने नोट परत मागितली, तरी दिली जात नाही. त्याचा आर्थिक तोटा होत असतानाच अधिकारी अरेरावीच्या भाषेत ' पंचनामा करून फिर्याद देऊ का ', असा दम देतात. त्यामुळे सामान्य माणूस निमूटपणे हा प्रकार सहन करतो.

पोलिसांनी व्यापाऱ्यांना व सर्वसामान्य नागरिकांना होणारा त्रास वाचवण्यासाठी बनावट नोटा बाजारात आणणाऱ्या टोळीचा तपास करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. बनावट नोटांना आळा घातला नाही, तर गुन्हेगारांचे चांगले फावून निरपराध लोक अडचणीत येण्याची शक्यता आहे. बनावट नोटांमध्ये पाचशे, शंभर अशा नोटांचा समावेश आहे. सणासुदीच्या दिवसामध्ये उरणमध्ये बनावट नोटा बाजारात आणणारी टोळी फिरते, असा संशय व्यक्त होत आहे. पोलीस यंत्रणेकडे या गुन्हेगारांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# महामार्गावरील वाहतूक निर्विघ्न

। माणगाव । प्रतिनिधी ।

कोकणातील दीड आणि पाच दिवसांच्या गणपतींचे आगमन होऊन विसर्जनही सुरळीत पार पडले. मुंबईहून कोकणात येताना आणि जाताना गणेशभक्तांना काही ठिकाणी खड्ड्यांचा सामना करावा लागला. मात्र, वाहतूक सुरळीत सुरू असल्याने सुदैवाने एकही अपघाताची नोंद झालेली दिसत नाही. महामार्गावर वाहतूक निर्विघ्न होत असताना माणगावमध्ये मात्र वाहतूक कोंडीचे विघ्न कायम आडवे येत आहे.

गणेशोत्सवाच्या आगमनापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई-गोवा महामार्गावरील खड्ड्यांचा पनवेल ते महाड असा पाहणी दौरा केला होता. त्या दौऱ्यात ठेकेदार आणि प्रशासनाला धारेवर धरले होते. तर, संबंधित ठेकेदारांवर थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर प्रशासन, पोलीस आणि ठेकेदार खडबडून जागे झाले. महामार्गावर भरपावसात दिवस-रात्र खड्डे बुजविण्यासाठी कार्यवाही सुरू झाली.

पनवेल ते माणगाव या ९० किमी अंतरात पाच ठिकाणी एकाचवेळी खड्डे भरण्यासाठी काम सुरू झाले. बहुतांश ठिकाणी खड्डे आधुनिक तंत्रज्ञानाने भरले. त्यामुळे गणेशभक्तांनी समाधान व्यक्त केले. इंदापूर, माणगाव आणि लोणेरे येथे वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक पोलीस, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवक ठिकठिकाणी तैनात करण्यात आले. मात्र माणगाव शहरातील महामार्गाचे रुंदीकरण झालेले नाही, इंदापूर आणि माणगाव या बायपासचे काम रखडले आहे. तसेच लोणेरे उड्डाणपूल तयार नसल्याने इंदापूर, माणगाव आणि लोणेरे या २० किमी अंतरात सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे वाहनांच्या २ ते ३ किमीच्या रांगा लागतात. इंदापूर ते लोणेरे येथे जाण्यासाठी दोन ते तीन तासांचे विघ्न येत आहे. माणगावच्या काळ नदीवरील नवीन पुलाचे काम कासवगतीने सुरू आहे. त्याचे काम पावसाळ्यात थांबले आहे. त्यामुळे काळ नदी पुलावरून एकेरी वाहतूक होत असल्याने संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे वाहनांच्या रांगा दिसत असतात.

या मार्गावर सुमारे १५० ते २०० स्वयंसेवक, वाहतूक पोलीस, पोलीस मित्र पोलिसांच्या हाकेला धावून आले. त्यांनी वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली. ठिकठिकाणी तात्पुरती प्रवाशांच्या सेवेसाठी पोलीस मदत केंद्र उभारण्यात आले आहेत. अशी सर्व प्रकारची सक्षम यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्याने सुदैवाने गेल्या १५ दिवसांत एकही अपघात झाला नाही.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे, ठिकठिकाणचे पोलीस निरीक्षक, वाहतूक पोलीस, स्वयंसेवक, पोलीस मित्र, सामाजिक संघटना, रिक्षा आणि वाहतूक संघटना यांनी उत्कृष्ट आणि उत्तम सहकार्य केल्याने गणेशभक्तांचा प्रवास निर्विघ्नपणे पार पडला आहे आणि यापुढेही सुखकर करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले जाणार आहेत, असा दावा पोलिसांनी केला आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● **वरसोली, रायगड** आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९

● **किहीम, रायगड** समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९

● **चौल, रायगड** मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९

● **अलिबाग एस.टी.स्टॅन्ड समोर** 'अलिबाग प्राईड' येथे पहिला माळा, 'रोड फेसिंग' सेमी कमर्शिअल फ्लॅट भाडेतत्वावर देणे/विकणे आहे. Area1000 sq.ft (2BHK Flat) Contact : 9579548535 ( स.९ ते सं.६)

● **दुकान भाड्याने मिळेल बेवुड,** गोंधळपाडा अलिबाग ९४२३३७५१९८/८४११०१६४४४

● **घरात घरकाम व मुलाची देखभाल** करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८५६५५५.

● **वरसोली समुद्राजवळ** २½ हजार sq.ft. ची जागा हॉटेल सुसज्ज फर्निचरसह पाणी २४ तास आणि इतर व्यवसायासाठी जागा योग्य भाड्याने देणे आहे.
संपर्क - ९४२३३७७४२२/९१३०२८३६७५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सकपदी डॉ. शीतल जोशी यांची नियुक्ती

। अलिबाग । प्रतिनिधी ।



जिल्हा सामान्य रुग्णालयात अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सकाचा प्रभार सांभाळणाऱ्या डॉ. शीतल जोशी यांच्याकडे पूर्ण वेळ अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून जबाबदारी सोपविली आहे. नुकतेच त्यांना याबाबतचे नियुक्तीपत्र देण्यात आले असून, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्याकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

डॉ. शीतल जोशी गेल्या अनेक वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर सुरुवातीला रायगड जिल्ह्यातील माणगावमधील इंदापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून रूजू झाल्या. त्यांनी सेवांतर्गत पदव्युत्तर शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून रुग्णालयात पूर्ण केले. त्यानंतर त्यांची नियुक्ती जिल्हा सामान्य रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून झाली. प्रयोगशाळा विभाग प्रमुख, रक्तपेढी विभाग प्रमुख म्हणून त्यांनी सक्षमपणे जबाबदारी सांभाळली. कोरोना महामारीच्या काळात जिल्ह्याच्या कोविड प्रयोगशाळेच्या स्थापनेपासून संपूर्ण कामकाज उत्तमरित्या सांभाळून रुग्णांना चांगली सेवा देण्याचा प्रयत्न केला. जिल्हा रुग्णालयातील अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सकपद रिक्त होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शनाखाली मागील वर्षभरापासून अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून अतिरिक्त जबाबदारी यांच्याकडे सोपविण्यात आली होती. त्यांनी वर्षभरात ही जबाबदारी खंबीरपणे सांभाळत कर्मचाऱ्यांसह रुग्णांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. रुग्णांना अधिक चांगली सेवा मिळावी यासाठी ते कायमच प्रयत्नशील राहिले आहेत.


● रायगडची रणरागिणी, माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांच्या जयंती दिनानिमित्त शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा नृपाल पाटील यांनी अभिवादन केले. ( छायाचित्र : अमोल नाईक )

## श्रीसदस्यांकडून गणेशमूर्तींचे पुन्हा विसर्जन

। मुरुड । वार्ताहर ।

मुरुड व मजगावमध्ये गणेश विसर्जन सोहळा साजरा झाला. विसर्जनाच्या दुसऱ्याच दिवशी सकाळी २२३ प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती वाहून आल्या. डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे त्या गणेशमूर्तींचे ३० श्रीसदस्यांनी पुन्हा खोल समुद्रात नेऊन विसर्जन केले.

मुरुड तालुक्यात प्लास्टरच्या मूर्तीचे प्रमाण कमी झाले आहे. पण शाडूच्या मूर्तीपेक्षा त्या मूर्ती स्वस्त मिळतात म्हणून त्या अजून आणल्या जातात. खरतर पर्यावरणाला घातक मूर्ती खरेदी करू नका. याबाबत जनजागृती केली जाते पण त्याचा वापर पूर्णपणे बंद होताना दिसत नाही. डॉ. नानासाहेब प्रतिष्ठान तर्फे श्रीसदस्य गेले अनेक वर्ष प्लास्टर



ऑफ पॅरिसच्या मूर्तीचे विसर्जन करण्याचे काम करत आहेत. तसेच किनारे स्वच्छ करतात पण जनजागृती होऊन मत परिवर्तन होणे गरजेचे आहे.

## दोस्त हे मस्त

### छोट्या आकाराचे सिनारापान



सिनारापान हा छोटासा मासा फक्त फिलिपाईन्समध्ये आढळतो. इथल्या लोकांचं ते अन्न आहे. त्यांच्या आहारातला महत्त्वपूर्ण घटक असणारा मासा अगदी छोट्या आकाराचा मासा आहे. त्याचं शरीर पारदर्शक असतं. शरीरावर दोन काळेभोर डोळे दिसतात. एवढा एकच रंग त्यांच्या शरीरावर असतो. हे मासे तळून खाल्ले जातात किंवा भाज्यांसोबत शिजवले जातात.

## खादाडी

### कुरकुरीत पापड भेळ

संध्याकाळच्या वेळी काय खायचं असा प्रश्न पडतो. घरी कोणी नसल्यावर बनवायचं तरी काय, असंही वाटतं. छोट्यांनो, अशा वेळी तुम्ही चविष्ट अशी पापड भेळ बनवू शकता. त्यासाठी पापड भाजून घ्या. वाटीभर चुरमुरे, दोन उकडलेले बटाटे, तिखट,कोथिंबीर, चिरलेला कांदा, टोमॅटो, फरसाण आणि शेव असं साहित्य घ्या. एका बाउलमध्ये चुरमुरे, कांदा, टोमॅटो, मीठ, बटाटे, कोथिंबीर, फरसाण आणि शेव घाला. भाजलेल्या पापडाचे तुकडे करून घ्या. वरून हे तुकडे घाला. भेळ छान मिसळा आणि आस्वाद घ्या.



## लाईफस्टाईल

### प्लास्टिकचा वापर कसा कमी करायचा?

छोट्या दोस्तांनो, प्लास्टिकमुळे पर्यावरणाचं किती नुकसान होतं हे तुम्हाला माहीत आहे. त्यामुळे प्लास्टिकचा वापर शक्य तितका कमी करायला हवा. प्लास्टिकला बरेच इको–फ्रेंडली पर्याय असतात. प्लास्टिकच्या टूथब्रशऐवजी तुम्ही बांबूचा ब्रश वापरू शकता. शाळेत स्टीलचा डबा घेऊन जा. प्लास्टिक वॉटरबॅगऐवजी स्टीलची किंवा तांब्याची बाटली नेता येईल. प्लास्टिक पिशवीऐवजी कागदी किंवा कापडी पिशवी न्या. अशाप्रकारे तुम्ही प्लास्टिकचा वापर कमी करू शकता.



## योगा टाईम

### चक्रासन

काही मुलं चिडचिड करतात. मुलांना लवकर रागही येतो. अशा मुलांनी चक्रासन करायला हवं. चक्रासनामुळे रक्तप्रवाह सुरळीत सुरू राहतो. शरीर शुद्ध होतं तसंच शरीरातल्या वेदनांपासूनही आराम मिळतो. मेंदूला योग्य प्रकारे रक्तपुरवठा झाला की चिडचिड कमी होते.



## सफर देशांची

# वनसंपदेने नटलेला केनिया

केनिया हा आफ्रिका खंडातला एक देश आहे. नैरोबी ही केनियाची राजधानी. केनियामध्ये ६० पेक्षा जास्त भाषा बोलल्या जातात. इथले लोक एकापेक्षा जास्त आफ्रिकन भाषा बोलतात. केनियामध्ये शालेय शिक्षण मोफत दिलं जातं. पण इथली बरीचशी मुलं घरातल्या तसंच शेतीच्या कामांमध्ये मदत करत असल्याने शाळेत जात नाहीत. संगीत आणि गोष्टी सांगणं या दोन गोष्टींना इथल्या संस्कृतीत महत्त्वाचं मानलं जातं. इथे राहणाऱ्या विविध समाजांनी गाणी, गोष्टी आणि कवितांमधून संस्कृती पुढे नेली.

हा देश हिंदी महासागर आणि व्हिक्टोरिया तलावाच्या मध्ये असल्यामुळे व्यापार–उद्योगासाठी सतत माणसांची ये–जा असायची. जगभरातून तसंच मध्य–पूर्वेतून लोक येत असत. यामुळे केनियामध्ये सांस्कृतिक वैविध्य पहायला मिळतं. विविध जातीधर्मांचे, वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक इथे राहतात. माणसाचा उगम सर्वात आधी उत्तर केनिया आणि टांझानियामध्ये झाल्याचं शास्त्रज्ञांचं मत आहे. इसवी सन १६०० आणि १७०० या काळात अरब, अमेरिकन आणि युरोपियन लोक केनियातल्या लोकांना गुलाम बनवून आपल्या देशात नेत असत.



केनियामध्ये भरपूर निसर्गसौंदर्य आहे. जंगलं आणि प्राणी पाहण्यासाठी लोक इथे भेट देतात. हत्ती, सिंह, चित्ता, झेब्रा, जिराफ, गेंडा यासारखे प्राणी केनियातल्या जंगलांमध्ये पहायला मिळतात. प्राण्यांच्या संरक्षणासाठी केनियामध्ये ५० पेक्षा जास्त अभयारण्यं आणि राष्ट्रीय उद्यानं आहेत. आफ्रिकेतलं वन्यजीवन पाहण्यासाठी अनेक परदेशी पर्यटक केनियाला येतात. जगात कुठेही न आढळणारे प्राणी इथे पाहायला मिळतात. १९२० ते १९६३ या काळात केनियावर ब्रिटिशांचं राज्य होतं. स्वातंत्र्यानंतर आता तिथे लोकशाही आहे. केनियन शिलिंग हे इथलं चलन आहे. स्वाहिली आणि इंग्रजी या इथल्या प्रमुख भाषा आहेत.

## कोण होणार?

# नेल आर्टच्या विश्वात...

फॅशनबाबत सध्या बरीच जागरूकता निर्माण झाली आहे. सध्या नेल आर्टचा ट्रेंडही आहे. कल्पकता आणि कलात्मकता हे गुण असतील तर तुम्हीही नेल आर्टिस्ट म्हणून नाव कमवू शकता.



नेल आर्टमुळे नखांचं सौंदर्य खुलतं. नेल पॉलिश लाऊन त्यावर छान नक्षीकाम करण्याची कला म्हणजे नेल आर्ट. या नेल आर्टला तुम्ही वेगवेगळ्या पद्धतींनी खुलवू शकता. कल्पनाशक्ती लढवू शकता. थ्रीडी तसंच विविध प्रकारच्या नेल आर्टची सध्या चलती आहे. कोणत्याही शाखेतली पदवी मिळवून तुम्ही नेल आर्ट शिकू शकता. सलून तसंच ब्युटी पार्लरमध्ये नेल आर्ट शिकवलं जातं. आवड म्हणूनही तुम्ही नेल आर्ट शिकू शकता.

नेट आर्ट शिकल्यानंतर तुम्ही स्वत:चा स्टुडिओ सुरू करू शकता. तिथे इतर सौंदर्यसेवांसोबत नेल आर्ट करून देण्याचं काम करता येतं. हॉटेल्स, क्लब्ज तसंच रिसॉर्टमध्ये नेल आर्टिस्टना खूप मागणी असते. लग्नसराई तसंच सणासुदीच्या काळात अनेक जणी नेल आर्ट करून घेतात. वेगळं काही तरी करायचं असेल आणि तुमच्या अंगात कला असेल तर नेल आर्टचा नक्की विचार करा.

## हेल्थ वेल्थ

# डॉक्टर असं का करतात?



मुलांनो... पोटदुखी, ताप, सर्दी–खोकल्यासारख्या तक्रारी घेऊन तुम्ही डॉक्टरांकडे जाता. मग डॉक्टर तोंडाची तपासणी करतात. हृदयाची धडधड तपासतात. यामागे डॉक्टरांचं काय तंत्र असावं?

पोटातल्या अवयवांचा आकार योग्य आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी डॉक्टर पोट दाबून तपासतात. पोटात काही गडबड असेल तर त्यांच्या लगेच लक्षात येतं आणि तुम्हाला औषध देता येतं. पोट दाबल्यावर विशिष्ट ठिकाणी तुम्हाला दुखतं का हे डॉक्टर बघतात. पोट दुखण्यामागचं कारण ते शोधून काढतात. डोळ्यांनी, जाणीवेने आणि ऐकून डॉक्टर तपासणी करतात. हृदयाची धडधड जास्त जोरात असेल तर त्यामागची कारणं ते शोधून काढतात.


डॉक्टर रूग्णाला काही प्रश्न विचारतात. काही दोष आहे का हे पाहण्यासाठी ते डोळ्यांची नीट तपासणी करतात. शरीराच्या विशिष्ट अवयवांना स्पर्श केल्यानंतर डॉक्टरांना आतली हालचाल जाणवते. जीभेवर पांढरा पट्टा आहे का? घशात कफ आहे का? जीभेचा रंग बदलला आहे का? हे जाणून घेण्यासाठी ते तोंडाची तपासणी करतात. डॉक्टरांकडे गेल्यावर तुम्हीही त्यांना काही प्रश्न विचारू शकता. विशिष्ट अवयवाची तपासणी का केली याबद्दल जाणून घेऊ शकता. तुमचं कुतूहल शमवू शकता. त्यामुळे पुढच्या वेळी डॉक्टरांकडे गेल्यानंतर त्यांना नक्की प्रश्न विचारा.

## फन टाईम

# भन्नाट जेऊ दे पाउमे आणि पँक्रेशन


जेऊ दे पाउमे म्हणजे गेम ऑफ पाम हा खेळाचा ऑलिम्पिकमध्ये केवळ एकदाच समावेश करण्यात आला होता. १९०८ च्या ऑलिम्पिक स्पर्धेत हा खेळ खेळवण्यात आला होता. जेऊ दे पाउमेला रिअल टेनिस किंवा कोर्ट टेनिस असंही म्हणत असत. सध्याचा लॉन टेनिस हा खेळ रिअल टेनिसचाच आधुनिक अवतार आहे. जेऊ दे पाउमेचा उगम फ्रान्समध्ये झाला. सुरूवातीच्या काळात हा खेळ रॅकेटशिवाय खेळला जात असे. खेळाडू हातांनी चेंडू टोलावत असत. सतराव्या शतकाच्या शेवटापासून खेळात रॅकेटचा वापर होऊ लागला.

अगदी जुन्या काळात ऑलिम्पिकमध्ये पँक्रेशन हा खेळही खेळवला जात असे. हा मार्शल आर्टसचा एक प्रकार आहे. यात बॉक्सिंग आणि रेसलिंग या दोहोंचं मिश्रण पहायला मिळत असे. यासोबत त्यात इतर काही तंत्रांचा खुबीने वापर केला जात असे. सध्याच्या बॉक्सिंग किंवा कुस्तीमध्ये पोटात ठोसा मारायला परवानगी नाही. पण पँक्रेशनमध्ये याला मान्यता होती. मात्र डोळा, नाक किंवा तोंडावर ठोसा मारायला परवानगी नव्हती. हा खूप धोकादायक असा खेळ होता. खेळाडूंना खूप तयारी करून मैदानात उतरावं लागत असे. १८९६ मध्ये जेव्हा आधुनिक ऑलिम्पिकची सुरूवात झाली



तेव्हा पँक्रेशनचा समावेश करण्यात आला नव्हता. १९६९ मध्ये जिम अर्वानिटिस यांच्या प्रयत्नांमुळे हा खेळ मार्शल आर्ट खेळणाऱ्यांपर्यंत पोहोचला. तर १९७३ मध्ये तो संपूर्ण जगाला परिचित झाला. पँक्रेशन हा ऑलिम्पिक खेळ नसला तरी त्याच्या विविध स्पर्धांचं आयोजन केलं जातं. २०१० मध्ये वर्ल्ड कॉम्बॅट गेम स्पर्धेत पँक्रेशनचा समावेश करण्यात आला होता.

## ठिपके जुळवा



## जिज्ञासा

### ओळखा पाहू...

१) विकसित आणि विकसनशील देशांना जोडणारा कालवा कोणता?
२) भारतातल्या कोणत्या राज्यात बॉक्साइटचं सर्वात जास्त उत्पादन होतं?
३) भारतातली युरेनियमची पहिली खाण कुठे आहे?
४) ताबो मोनॅस्ट्री कोणत्या राज्यात आहे?
५) भारताचं फॅनाटिक स्पोर्टस म्युझियम कोणत्या शहरात सुरू झालं?
६) टी–२० विश्वचषकात सहभागी झालेल्या भारताच्या महिला टी–२० संघाची कर्णधार कोण आहे?
७) वेरूळच्या लेण्यांमधलं कैलाशनाथ मंदिर कोणी बांधलं आहे?
८) अलेक्झांडर द ग्रेटने भारताला कधी भेट दिली?
९) फ्रान्समधल्या कोणत्या बेटावर नेपोलियनचा जन्म झाला?
१०) अमेरिका कोणत्या वर्षी स्वतंत्र झाला?

उत्तर : १) सुएझ कालवा २) ओडिसा ३) जादूगौडा ४) हिमाचल प्रदेश ५) कोलकाता ६) हरमनप्रीत कौर ७) राष्ट्रकुट राजा कृष्णा ८) इसवीसन पूर्व ३२६ ९) कोर्सिका १०) १७७६

## स्मार्ट टॉक

# चित्रपटातले गॅझेट्स

मित्रांनो, जेम्स बाँडच्या चित्रपटात वेगवेगळ्या प्रकारच्या गॅझेट्सचा वापर करण्यात आला. जेम्स बाँडच्या प्रत्येक भागात नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. चित्रपटातल्या या गॅझेट्सचा प्रत्यक्षातही वापर होऊ लागला. याच गॅझेट्सबद्दल जाणून घेऊ या...

✻ १९८५ च्या 'अ व्यू टू अ किल' या चित्रपटात हेडफोन आणि म्युझिक प्लेअर असलेल्या गॉगल्सचा वापर करण्यात आला होता. त्यानंतर एका कंपनीनं अशा गॉगल्सची निर्मिती केली.

✻ १९७१ च्या 'डायमंड्स आर फॉरेव्हर' या चित्रपटात फिंगर प्रिंट स्कॅनर्सचा वापर करण्यात आला होता. आता या तंत्रज्ञानाचा वापर सगळीकडे सर्रास केला जातो.



✻ 'ऑन हर मॅजेस्टीज सिक्रेट सर्व्हिस' या चित्रपटात मायनॉक्स कॅमेऱ्याचा वापर करण्यात आला होता. १९७० च्या दशकात हा कॅमेरा खूप लोकप्रिय झाला होता.

✻ बाँड सिरिजमधला चित्रपट 'फॉर युवर आईज ओन्ली'ने वॉकी टॉकी रिस्ट वॉचला नवी ओळख मिळवून दिली.

✻ १९६४ च्या 'गोल्ड फिंगर' या चित्रपटात ट्रॅकिंग डिव्हाइसचा वापर करण्यात आला होता. यानंतर प्रत्यक्षातही गुप्तहेर याचा वापर करू लागले.


✻ 'गोल्ड फिंगर' या चित्रपटात लेजर तंत्रज्ञानाने स्टील कापण्याचं तंत्रज्ञान विकसित करण्यात आलं. आता या तंत्रज्ञानाचा सर्रास वापर केला जातो.

काय शक्य आहे की नाही चित्रपटातून प्रेरणा घेऊन काही वेगळं करणं?

## व्हॉट्स न्यू?

# काय आहे ई-सिम?

मोबाईल फोनमध्ये सिम कार्ड घातलं जातं. सिम कार्डाशिवाय मोबाईल वापरता येत नाही. सिम म्हणजे सब्सक्रायबर आयडेंटिटी मॉड्यूल, सिम म्हणजे छोट्या आकाराची चिप. या चिपमध्ये युजरची माहिती नोंदवून ठेवलेली असते. गेल्या तीन ते पाच वर्षांमध्ये सिम कार्डमध्ये बरेच बदल झाले. कालानुरुप कार्डाचा आकार छोटा होत गेला. सुरूवातीच्या काळात मिनी सिमचा वापर होत असे. त्यानंतर स्मार्टफोनमुळे मायक्रो आणि नॅनो सिमचा वापर सुरू झाला.




आता तर ई सिमही बाजारात दाखल झालं आहे.

ई सिम म्हणजे नेमकं काय? त्याचे कोणते लाभ आहेत, हे आपण जाणून घेऊ या. ई सिम म्हणजे इंबेडेड सब्सस्क्रायबर आयडेंटिटी मॉड्यूल. या तंत्रज्ञानासाठी सॉफ्टवेअरची मदत घेण्यात आली आहे. हे तंत्रज्ञान याआधी स्मार्टवॉचमध्ये वापरलं जात असे. पण आता ते आयफोनच्या नव्या मॉडेल्समध्ये वापरण्यात आलं आहे.

ई सिम फोनमध्ये बसवलं जातं. एकदा बसवलेलं ई सिम पुन्हा काढता येत नाही. म्हणजेच तुमचं सिम कधी हरवत नाही. स्मार्टफोनच्या प्रकारानुसार वेगवेगळ्या आकाराची सिम लागतात. पण ई सिमच्या बाबतीत आकाराची काळजी करायचं काहीच कारण नाही.

सिम कार्डाने कमी जागा व्यापली तर नव्या तंत्रज्ञानासाठी इतर जागेचा वापर करता येऊ शकतो. स्मार्टफोनमध्ये सिमकार्डसाठी वेगळी जागा दिलेली असते. ई सिममुळे ही जागा ठेवण्याची गरज पडणार नाही आणि त्याऐवजी कंपन्या वेगळी सुविधा देऊ शकतील. त्यामुळे हे लाभकारक ठरतं.

## करून तर पहा


# घरीच बनवा तोरण

मित्रांनो, सणावारी दाराला तोरण लावलं जातं. दसरा–दिवाळीला हमखास तोरण लावतात. हस्तकलेची आवड असेल तर तुम्हीही घरी तोरण बनवू शकता. तोरण बनवण्याची सोपी पद्धत जाणून घेऊ.

**साहित्य** : लाल, केशरी आणि पिवळ्या रंगाचे कागद, लाल किंवा ब्राऊन रंगाचे क्रेयॉन किंवा खडू, दोरा किंवा वायर, सेलोटेप, झाडाची पानं.

**कृती** : झाडाची खरी पानं टेबलवर ठेवा. देठ असलेली बाजू खाली जाऊ द्या. आता या पानावर विविध रंगांचे कागद ठेवा. आता क्रेयॉन किंवा खडूच्या मदतीने कागदावर पानाचा आकार काढून घ्या. कात्रीने पानांचे आकार कापून घ्या. पानांचे वेगळे आकारही चालतील. तुमच्या आवडीच्या रंगांचे कागद घेता येतील. भरपूर पानं कापून झाली की पानांच्या वरच्या बाजूला भोक पाडा. आता ही सगळी पानं दोऱ्यात ओवून घ्या. कल्पकता असेल तर तुम्ही कागदी फुलं तयार करू शकता. पानांवर छानसं नक्षीकामही करू शकता. ग्लिटरचा वापर करून पानांवर सोनेरी किंवा चंदेरी नक्षी काढता येईल. त्यावर खडे किंवा चांदण्या चिकटवता येतील. तुमच्या आवडीप्रमाणे ही सजावट करता येईल. मग काय, मोकळ्या वेळेत कामाला लागा आणि छानशी तोरणं तयार करा. नवरात्रींमधल्या प्रत्येक दिवशी विशिष्ट रंगाचे कपडे घातले जातात. तुम्हीही त्या त्या रंगांची तोरणं तयार करून दाराला बांधू शकता. ही तोरणं भेट म्हणूनही देता येतील.






## न्यू टेक

# स्मार्ट कपडे?


तंत्रज्ञानामुळे सध्या सगळं काही स्मार्ट होत आहे. थंडीपासून बचाव करणारे कपडे घालतो. स्वेटर, शाली, जॅकेट्स, मफलर, थर्मल वेअर असं बरंच काही घालावं लागतं. पण आता स्मार्ट कपड्यांमुळे तुमचा थंडीपासून बचाव होणार आहे. कॅनडामधल्या इंजिनिअर्सच्या एका टीमने स्मार्ट कपडे तयार केले. ते घातल्यानंतर मोबाईल ॲपचा वापर करून तापमान नियंत्रित करता येणार आहे. 'स्कीनकोर' असं त्यांचं नाव आहे. हे कपडे म्हणजे पूर्ण बाह्यांचा टी शर्ट आणि पँट आहे. ते घातल्यानंतर व्यक्तीच्या गरजेनुसार तापमानात आपोआप बदल होतात.



या कपड्यांमध्ये बॅटरी बसवण्यात आली आहे. यामुळे आठ तासांपर्यंत कपडे गरम राहू शकतात. मोबाईलच्या चार्जरने बॅटरी चार्ज करता येते. या कपड्यांमुळे शरीराच्या विशिष्ट अवयवांना जास्त ऊब मिळते. शरीराचं तापमान वाढू लागलं की यातले सेंसर्स ऊब देणं बंद करतात. थंडी वाजायला लागली की सेंसर्सचं काम पुन्हा सुरू होतं. हे स्मार्ट कपडे घातले की इतर गरम कपडे घालण्याची गरजच पडणार नाही.

# कलासक्त

**मराठी रंगभूमीवरील हरहुन्नरी व विनोदी अभिनेता विजय कदम याचे नुकतेच १० ऑगस्ट रोजी कॅन्सरच्या आजाराने निधन झाल्याने मराठी रंगभूमी व मराठी चित्रपटसृष्टीची खुप मोठी हानी झाली आहे. १९७० च्या दशकात मराठी रंगभूमीवर तीन 'विजय' यांनी खूप धुमाकूळ घातला होता. पुरूषोत्तम बेर्डे यांच्या 'टूरटूर' नाटकाने या तीन विजय यांना, विजय चव्हाण, विजय कदम व विजय साळवी यांना खूप प्रसिद्धी मिळवून दिली होती. पुढे विजय चव्हाण, विजय साळवी यांनी सुयोगच्या 'मोरूची मावशी' या नाटकांतून, तर विजय कदम यांनी 'विच्छा माझी पूरी करा' या दादा कोंडके यांनी गाजवलेल्या नाटकांतून धमाल उडवून दिली होती.**




## विनोदवीर विजय कदम

विजय कदम यांचा जन्म मुंबईतील गिरणगावात ४ जून १९५७ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव दत्ताराम कदम असे होते. त्यांचे शालेय शिक्षण दादरच्या शिरोडकर हायस्कूलमध्ये झाले. तेथील तळाशीकर, सावंत व परब यांनी त्यांना शाळेतील समारंभात बालनाट्यात काम करण्याची संधी दिली व त्याला प्रोत्साहन दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विजयने 'राजा भिकारी माझी टोपी चोरली' या बालनाट्यात हवालदाराची विनोदी भूमिका केली. त्यानंतर दरवर्षी आंतरशालेय एकांकिका व अभिनय स्पर्धेत कॉलेजमध्ये घेतले व 'तत्वज्ञान' हा गंभीर विषय घेऊन त्याने पदवी संपादन केली. आंतरविद्यालयीनएकांकिकास्पर्धांत काम करताना त्याला अनेक व्यावसायिक दिग्दर्शकांचे मार्गदर्शन मिळाले. या काळात रमेश भाटकर, विजय पाटकर, जयवंत वाडकर, लक्ष्मीकांत बेर्डे आदी नाट्यवेडे मित्र त्याने मिळविले. महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्याची पहिला विद्यार्थी दिग्दर्शक म्हणून निवड झाली. त्यावेळी हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते डेव्हिड यांचे हस्ते त्याला सन्मानित करण्यात आले. विजय कदम यांनी आपल्या कुमारवयात 'अपराध कुणाचा' हे व्यावसायिक नाटक केले. त्यानंतर 'स्वप्न गाणे संपले' या नाटकात सतिश दुभाषी, जयराम हर्डीकर, शिवाजी साटम या प्रतिथयश अभिनेत्यांसह काम केले. शरद तळवळकर व राजा गोसावी हे त्यांचे अत्यंत आवडते अभिनेते होते, त्यांच्यासारख्या अभिनय आपल्याला करता आला पाहिजे असे त्याला वाटे. 'खंडोबाचं लगीन' या जागरण विधी नाटकातील 'हेगडी प्रधान' या भूमिकेस विजय कदम यांना 'नाट्यदर्पण' चा सर्वोत्कृष्ट लोकनाट्य अभिनेता हा पुरस्कार मिळाला. 'रथचक्र', 'घरटे आमुचे छान', 'वासुदेव सांगाती', अशी व्यावसायिक नाटके करीत असतानाच विजय कदम यांना पुरूषोत्तम बेर्डे यांचे 'टूरटूर' हे नाटक मिळाले. या नाटकाला प्रचंड यश व प्रसिद्धी मिळाली. विजय कदम व लक्ष्मीकांत बेर्डे यांची ड्रायव्हर कंडक्टरची जोडी व सोबतीला घरामधल्या प्रवासात विजय चव्हाण, प्रशांत दामले, जयवंत वाडकर, विजय पाटकर, दिपक शिर्के अशा ताज्या दमाच्या कलाकारांचा तांडा असल्याने प्रत्येक प्रयोग हा एक उत्सवाचा व उत्साहाचा जल्लोष असे. याच नाटकात काही प्रयोगात पद्मश्री जोशी यांनी काम केले होते. पद्मश्री ही अभिनेत्री व निर्माती पल्लवी जोशी व अलंकार यांची बहिण. याच नाटकात काम करीत असताना त्यांची मैत्री झाली. या मैत्रीमुळे नाटकाच्या दौऱ्यांत विजय तिला आपल्या जुन्या प्रेमप्रकरणांची सर्व माहिती देत असे व एक चांगली मैत्रीण म्हणून पद्मश्री त्या कथा ऐकत असे. त्यावेळी एका डायरीत ती सर्व प्रकरणे लिहून ठेवत असे. पुढे या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. त्यानंतर विजयने तिला कशासाठी प्रपोज केले पण तिने नकार दिला. असे दोन वेळा घडल्यावर विजय गप्प बसला. पण पुढे विजयला 'विच्छा माझी पुरी करा' हे लोकनाट्य मिळाल्यावर त्याचा प्रयोग बघण्यासाठी विजयने पद्मश्रीला बोलावले, पण लोकनाट्य तमशा असे बघण्यासाठी मला घरांतून परवानगी मिळणार नाही असे तिने सांगताच विजयने तिची समजूत घातली. 'तू समजतेस तसं आता लोकनाट्यात अश्लिल असे काही नसते. तू एकदा पाहून खात्री कर.' असे त्याने सांगितल्यावर एक प्रयोगाला येण्याचे पद्मश्रीने मान्य केले. पण 'प्रयोग संपल्यावर तू मला घरापर्यंत सोडायला येणार असशील तरच मी प्रयोगाला येईन.' अशी अट तीने घातली, विजयने ते कबूल केल्यावर पद्मश्री प्रयोगाला आली व तिने त्याला अभिनयाची प्रशंसा केली. ठरल्याप्रमाणे तो तिला सोडायला तिच्या माहीमच्या घरापर्यंत गेला. घराच्या दरवाजाजवळ येताच पद्मश्रीने विजयला विचारले, 'माझ्याशी लग्न करशील?' विजयने गंभीर होऊन सांगितले. 'मला विचार करावा लागेल.' व तो हसला. आणि पुढे तेथेही लग्न बंधनात अडकले, ते वर्ष होते १९८७. त्यानंतर दोघांनी मिळून 'विजयश्री' नावाची एक नाट्यसंस्था स्थापन केली व त्या माध्यमातून त्यांनी ज्याप्रकारे 'विच्छा...' मध्ये लेखक वसंत सबनीस व दादा कोंडके यांची बतावणी व जुगलबंदी होते, त्याप्रकारे बतावणी बसवून व त्यात लोकनाट्ये, विनोदी प्रसंग यांची सांगड घालून 'खुमखुमी' नावाचा कार्यक्रम बसविण्यात आला. जो खूप लोकप्रिय झाला व त्याचे अनेक प्रयोग झाले. या प्रयोगातून अनेक सामाजिक संस्था व गरजू अपंगांना आर्थिक मदत करण्यात आली.


विजय कदम यांनी आम्ही दोघं राजाराणी, चष्मेबहाद्दर, बंध प्रेमाचे, अशी पाखरे येती, ब्लफ मास्टर, माझा मी, दैवत माझा मल्हारी, धुरंदर भाटवडेकर, कॅरी ऑन देशपांडे, मोहर, चाहतो मी तुला, पोलीस लाईन, शामची शाळा, चालू द्या तुमचं, मंकी बात, तु.का. पाटील, ट्रकभर स्वप्न, एक ती वऱ्हाडी वाजंत्री, सारे सज्जन, हळद रूसली कुंकू हसलं, तेरे मेरे सपने, देखणी बायको नाम्याची, कोकणरम्य, इरसाल कार्टी, रेवती आदी चित्रपटांतून विविध प्रकारच्या भूमिका केल्या. याशिवाय त्यांनी 'आम्ही आलो रे', 'सही रे सही', 'पप्पा सांगा कुणाचे?', 'रथचक्र', 'टूरटूर', 'खंडोबाचं लगीन', 'हलकं फुलकं', 'विच्छा माझी पुरी करा' आदी नाटकांतून वैशिष्ट्यपूर्ण भूमिका केल्या. विजय कदम यांनी मराठी दूरदर्शन मालिका पार्टनर, गोट्या, दामिनी, इंद्रधनुष्य, घडलंय बिघडलंय, ती परत आलंय आदी मालिकांतून कामे करतानाच त्यांनी श्रीमान श्रीमती, मिसेस माधुरी दीक्षित, घर एक मंदिर व अफलातून या हिंदी दूरदर्शन मालिकांतूनही कामे केली.

विनोदवीर दादा कोंडके यांनी जेव्हा वसंत सबनीस लिखीत 'विच्छा माझी पुरी करा', हे लोकनाट्य सादर करण्याचे जेव्हा थांबवले, त्यावेळी हे नाटक काही काळाने विजय कदम यांचेकडे आले. नवीन संचांतील या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला विजय कदम यांना शुभेच्छा देण्यासाठी दादा कोंडके यांनी आपली माणसे नाट्यगृहात पाठविली होती. त्यानंतर एकदा कोल्हापूरात दादांची व विजयची भेट झाली, त्यावेळी दादांनी विजयचे कौतुक केले व मी एकदा गुपचूप येऊन तुझे नाटक पाहिले होते अशी कबुलीही दिली. दादांची ही करामत ऐकून विजयही भारावून गेला.

पुरुषोत्तम बेर्डे यांचे 'टूरटूर' चे प्रयोग सुरू असताना अनेक नवीन कलाकार या नाटकात भाग घेत असत. प्रशांत दामले यांनी याबाबत सांगताना, 'जेव्हा आजही या प्रयोगात काम करू लागले तेव्हा विजय आम्हाला सीनीयर होता. आम्ही प्रदीप पटवर्धन, जयवंत वाडकर त्याला फॉलो करत होतो. विजयचे भाषेवर प्रभुत्व होते व सहकलाकारांना सहाय्य करण्याचा त्याचा गुण वाखाणण्याजोगा होता. मी जेव्हा प्रथम सिनेमात काम करू लागलो तेव्हा मला नाटकातील रिॲक्शन व सिनेमातील रिॲक्शन कशा वेगळ्या असतात हे त्याने समजावून सांगितले व मार्गदर्शन केले. विजयचा मित्रसंग्रह खूप मोठा होता. खऱ्या अर्थाने तो जगन्मित्र होता. मागील दोन वर्ष तो कॅन्सरशी झगडत होता. पण जयवंत वाडकर व विजय पाटकर या दोघांनाच त्याच्या व्याधीबाबत माहिती होती. बाहेर कुणाला त्याने याबाबत जाणवू दिले नाही. केमोथेरपीच्या फेऱ्याही त्याने धीराने घेतल्या. पद्मश्री त्याच्यापाठी ठामपणे उभी होती. तिने त्याला आधार दिला. अखेर १० ऑगस्टला त्याची प्राणज्योत मालवली. इतरांना देणारा विजय स्वतःचे दुःख लपवून आपल्यातून निघून गेला.

●●

## कान्हा शिष्य



कवीने कान्हा शिष्य म्हणून कसा याचे सुंदर वर्णन प्रस्तुत कवितेत केले आहे. तुलनात्मक दृष्ट्या सर्व कवितांमधे ही कविता मोठी आहे. एकूणच आदर्श शिष्य कसा असावा हे कवितेतून प्रत्ययास येते.

एक वेगळाच शिष्य कवीने पाहिला आहे. गुढ, अगम्य असा कान्हा कसा कुणाला कळावा असे कवी म्हणतो. एके दिवशी येतो आणि मला तुमचा शिष्य व्हायचं आहे असं सांगतो. कसं वागावं, कसं बोलावं, सगळं शिकायचं आहे असं म्हणतो. स्वतःला जणू अज्ञानी दाखवून माझ्या ज्ञानाचे मात्र कौतूक करतो.

असा शिष्य लाभणे म्हणजे माझे दैवच म्हणायचे अशा कवीच्या भावना असतानाच खरंच मी किती मूर्ख आहे हे आणि त्याने कसे माझ्या भोवती जाळे विणले आहे हे कवीलाच ऊमगले नाही असे कवी म्हणतो. त्याच्या जाळ्यात गुंतत असतानादेखील थोडेही दुःख मात्र स्पर्शलेही नाही.

**'कृष्णगान'**

**शशिकांत मुद्देबिहाळकर**
९७६७१५२६०८

**खरंतर, माझे मलाच जिंकता आले नव्हते**

आणि जग जिंकायला मी निघालो होतो, अहंकार तर सुटलेला नसताना दुसऱ्याला उपदेश करणयाचा घाट घातला होता, शांतीचा प्रसाद मिळविण्यासाठी जगाला शांतीचे धडे देत होतो. आत्मत्व कळत नसताना ते शांतविण्याचा प्रयत्न करत होतो. एकूण शेवटी कान्ह्याने माझी प्रौढी नष्ट करण्यासाठीच मला शासन दिले. माझ्या मनाचा अहंकार, माझी स्तुती करून तो फुलवित होता. माझ्या काव्याची स्तुती तो करत होता. माझ्या किर्तीचे वर्णन तो करीत होता. मला हे सगळं खरंच वाटलं की, तो एक अज्ञानी उत्तम शिष्य आहे, म्हणून सत्वर उपदेश करून मी त्याला सुसंस्कृत करीत होतो. हे करावे, ते करू नये, नको ते मित्र करू नयेत, असत्य बोलू नये, लोभ मनी धरू नये, चांगली पुस्तके वाचावीत, भलते सलते वाचू नये, नित्य, मी धडे देतच होतो, तरी मला एक चिंता सतावित होती. नीतिमान पत्नी जशी पतीची आज्ञा मोडते, तसाच काहीसा ही शिष्य विपरित वागत असे, मला तो अल्प मतीचा वाटे, संपत्तीचा मात्र डामडौल जाणवत होताच. त्याची कीर्ती तर विश्वभर पसरली होती.मला कळेचना की हे सर्व काय चालले आहे, हा तर शिष्योत्तम माझीच आज्ञा मोडू लागला आहे, जणू निंदा करण्याचे वचनच त्याने घेतले असावे असे वाटे. सर्वजण त्याचा उपहास करीत, लहान मोठे त्याची चेष्टा करीत.

सर्वांचेच तो लक्ष झाला आणि त्याची सर्वजण टिंगल करू लागले. दिवसेंदिवस तो बिघडतच चालला, रस्त्यावरचे लोक त्याला वेडा म्हणून हिणवत असत. त्याने खूप मोठे व्हावे म्हणून मी कष्ट घेऊ लागलो, परंतू माझे श्रम वाया जाऊ लागले, ते दुःख मला सहन होईना, त्याच्या वेड्या कृती पाहून माझ्या हृदयाला छिद्रे पडताहेत असे कवीला वाटे. नव्याने मी त्याला सुधारण्यासाठी प्रयत्न करू लागलो, धडे देऊ लागलो, गोष्टी सांगू लागलो, तात्पर्य शिकवू लागलो, परंतू त्या शिष्योत्तमाला काही देवत्व मी देण्यास अपयशी झालो. त्याची निंदा होऊ नये हीच माझी अपेक्षा होती. मी त्याचेवर रागावलो, खूप टाकून बोललो, पण व्यर्थ! त्याचा हसरा चेहरा पाहून माझा राग निवळला, समजावणीच्या सुरात त्याचे मन वळविण्याचे मी ठरविले. विनोद करून त्याला रिझविण्याचेही प्रयत्न मी केले. हेतू हा की तो मार्गी लागावा, परंतू देवा काय विपरीत झाले तो तर अधिकच वेडसर झाला, जणू राना मधील पशूसारखाच.

कशातच त्याला रस नव्हता, कोणतेही जिंकण्याचे ध्येय नव्हते, जणू मर्कटासारखा वागू लागला. काय, म्हणावे काही कळेना, माझ्या अहंपणाला दुखवित तो कुठेही हिंडत होता.

शेवटी कवीने कृद्ध होऊन निश्चय केला की कान्ह्याला सन्मार्गाला आणीनच.

कवीला वाटले त्याला काही काम द्यावे म्हणजे तो स्वतःच घडेल. त्याला घरी घेऊन आल्यावर म्हटले, मला ठाऊक आहे की तूझे माझ्यावर प्रेम आहे, माझ्याविषयी तुझ्या मनात नितांत आदर आहे, म्हणूनच तूला आता मी काम सांगतो ते तू करावेस. तुला तर ठाऊकच आहे की हाती चांगले काम घेतले की चारित्र्य मंगलमय होते, सतसंगतीचे फळ चांगलेच असते, सांगाती असे असावेत की त्यांना काव्याची आवड असावी, ते तत्त्वज्ञानी असावेत त्यामुळे त्यांच्या संगतीत वेळ सुखाने व्यतीत होईल

ज्यांचे घरी काव्य, विनोद, असतो त्यांचेच घरीच लक्ष्मी वास करते, कवी त्यालाच विचारतो तुझ्याशिवाय कोणी माझ्या संगती यावे सांग बरे? तूच माझ्या संगती असावे तेच उत्तम वाटते मला.

या गोष्टीला तू नकार देऊ नकोस कारण त्यामुळे मी दुःखी होईन. कान्हा या गोष्टीला तत्पर संमती देतो. कामाविण मी कसा राहू? काहीतरी काम द्यावे अशी मागणी करतो. नंतर कवीला खूप आनंद होतो आणि त्याला कवी काव्य लिहिण्यास देतो. दररोज नीटपणे काव्य, लिहावे आणि मला दाखववावे असे त्याला कवी सांगतो.

क्षणभर थांबून कान्हा ''बरे आहे''असे म्हणून निघू लागतो. मग कवी थोड्या रागानेच त्याला एक जुन्या कथेचे हस्तलिखित देतो. कान्हा, आता छान काम करेल असे कवीला वाटते. तो निघून जातो म्हणून निघतो तेंव्हा मात्र कवीला राग येतो.

दिलेला शब्द फिरवतो म्हणूनच तूला वेडा म्हणतात, असे कवी त्याला सांगतो, परंतू लिहायला परत येईन असे कान्हा सांगतो. मग रागाने कवी त्याला सांगितलेले काम पूर्ण करावे असे बजावतो.


पुन्हा त्याला विचारतो की, ते दिलेले काम तू सत्वर पूर्ण करशील की नाही? रागाने कवीने असे विचारल्यावर कान्हा ''नाही''असे म्हणून उभा रहातो. त्याचे डोळे क्रोधाने लाल होतात, ओठ थरथर कापू लागतात.

मग मात्र कवी त्याला निघून जा, आणि पून्हा तोंडही दाखवू नकोस. असे सांगतो, क्षणभरही थांबू नकोस असे सांगितल्यावर तो कान्हा म्हणजे कृष्ण चालू पडतो. हे असे घडल्यावर मात्र कवी शांत होतो, त्याच्या डोळयात अश्रू उभे राहतात. आयुष्यमान हो, ईश्वर तूझे रक्षण करो असे कवी त्या शिष्य कान्ह्याला आशिर्वाद देतात, मग कवी म्हणतात ''माझ्या मनात खूप इच्छा होती तुला मनासारखे घडविण्याची, पण माझे प्रयत्न निष्फळ ठरले, आता मला सर्व कळून आले आहे, ''आता पुन्हा नकोस येऊस इकडे'' असे सांगितल्यावर कान्हा तसाच निघून जातो. परंतू क्षणात मागे फिरून सारे काव्य मी लिहून देईन असे मान्य करतो. त्याचे अक्षर सुंदर असते, काव्य मनोहारी असते, आजपासून तुमचे उपदेशांचे पालन करीन असे गुरूंना म्हणजे कवीला सांगतो. माझ्यामुळे अपकिर्ती येणार नाही, माझ्या कृतीने अपरंपार किर्ती प्राप्त होईल असे सस्मित वदनी सांगून तो तत्क्षणी अंतर्धान पावतो. कवीच्या मनात त्याची एक सुंदर प्रतीमा प्रकटते, कवी म्हणतो उत्पत्ती वा नाश या जगी तुझ्या हातात नाही, जगात काही करावेसे वाटले तर, ते निर्मोही मनाने करावे.तू काव्यलेखन करण्यास संमती दिली आणि हार मानलीस तिथेच अहं जळाला.

त्याच क्षणी तू मला जिंकलेस, क्रोधही जावा, आणि लोभही निमावा हेच कान्हा सांगून गेला. ज्या ज्या कार्याची, गोष्टींची इच्छा मनी करशील ते ते सर्व तूला लाभो, त्याची पूर्तता होवो असे आनंदाने कान्हा म्हणतो, कवी त्याचा जयजयकार करीत प्रस्तुत कविता संपन्न करतो. कवीने या कवितेत शिष्याचे सर्व गुण अवगुण, सांगून कान्हा म्हणजे श्रीकृष्ण शिष्य म्हणून किती श्रेष्ठतम होता याचे हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. कविता वाचतानाच त्याच्यातील देवत्व जाणविल्याशिवाय रहात नाही. याची प्रतिमा डोळ्यासमोर उभी राहून डोळ्यात त्याच्या अवखळपणाचे आनंदाश्रू ऊभे रहातात.

**(कवी प्रा. श्रीप्रकाश अधिकारी)**

**आनंद बक्षी म्हणजे हिंदी कवितांच्या काव्यविश्वात निर्व्याजपणे विहरणारा शब्दप्रभू. कविता हाच त्यांचा श्वास होता. आपल्या असिम प्रतिभेने त्यांनी रुपेरी पडद्याच्या दालनात प्रवेश केला. आपल्या शब्दांच्या जादूने त्यांनी चित्रपट रसिकांच्या हृदयात प्रवेश केला आणि त्यांची हृदये जिंकली.**



## आनंद बक्षी शतकातले सर्वोत्तम शब्दप्रभू गीतकार

श्रीराम शेटये

त्यांच्या लेखणीत जादूच तशी होती. त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या गीतांनी तरूणाईला झिंग आणली. खरंतर आनंद बक्षी यांना गायक व्हायचे होते. परंतु त्यांच्यातील कविने गायकावर मात केली.

ते गीतकार बनले आणि रसिकांचे जीवन फूलवणारी अविस्मरणीय शब्दांची गाणी जन्माला आली. शब्दांच्या या जादूगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई-मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो आनंद बक्षींच्या लेखनीने या सर्व भावना रसिकांच्या हृदयावर ठसायच्या.

सहज ओठावर येतील असे आशयघन शब्द, मनाला भावणाऱ्या शब्दांची यमक अलंकारात केलेली सहज सोपी गुंफून ही आनंद बक्षी यांच्या गाण्याची वैशिष्ट्ये होती. रसिकांच्या मनातले भाव नेमकेपणाने त्यांच्या गीतात उतरायचे. मैत्री असो की द्वेश, प्रेम असो की मत्सर, वात्सल्य असो की फॅन्टसी. आनंद बक्षी यांची लेखणी हे सारे भावविश्व चपखलपणे टिपायची.

निसर्गसंपन्न काश्मीर सुंदर नदीकिनारा. वेड लावणारा निसर्ग पाहून मन मोहरून जाते. काय चित्रपट बनविले जायचे त्या काळात. लोकेशन, गाणी, कलाकार सगळेच स्वर्गीय वाटावे एवढे लाजवाब. देखणा ऐन उमेदीत असलेला शशी कपूर तरफ्यावर बसला आहे. परदेशी पर्यटकांच्या प्रतिक्षेत. त्याची हाऊसबोट आधीच बुक झालेली आहेत. परंतु ज्यांनी बुक केलेली ते आलेलेच नाहीत. तेवढ्यात काश्मीर पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी आलेली अल्लड तरूणी समोर येते. नंदा अमेरिकेतून शिक्षण घेऊन भारतात आलेली तरूणी दाखविली आहे. एवढ्या हाऊस बोटीतून तीला शशी कपुरचीच बोट आवडते. शशी कपूर तिला संपुर्ण कश्मीर फिरवतो. कश्मीर फिरवता फिरवता दोघे एकमेकांच्या प्रेमात कधी पडतात ते त्यांनाच कळत नाही. असा हा सुंदर सीन होता 'जब जब फुल खिले' या चित्रपटाचा.

आनंद बक्षी यांची अर्थपूर्ण गीते आणि कल्याणजी आनंदजी यांचे मन लुभावणारे संगीत यांनी हा चित्रपट नटलेला आहे. 'परदेशीयोंसे ना अखिया मिलाना' हे गाणं महमद रफिने जीव ओतून गायलं आहे. कल्याणजी आनंदजी यांच्या अप्रतिम संगीताने नटलेले हे गाणे. काश्मिरच्या नयनमनोहर निसर्गाच्या सानिध्यात चित्रित करण्यात आले आहे.

'परदेशीयोंसे ना अखिया मिलाना परदेसीयोंको है एकदिन जाना' किंवा 'एक था गुल और एक थी बुलबुल' ही विरहगीते अजरामर झाली आहेत. त्या काळात हा चित्रपट सुपरहीट तर झालाच होता. आनंद बक्षी यांची गीते चाहत्यांच्या हृदयात रूंजी घालत होती.

''जब जब फुल खिले'' हिट झाल्यानंतर या चित्रपटातील कलाकारांचा सत्कार करण्यासाठी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून दिलिप कुमार यांना बोलविण्यात आले होते. सत्काराच्या वेळी सर्वांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. परंतू शेवटच्या खुर्चीवर असलेल्या आनंद बक्षी यांना द्यायला पुष्पगुच्छ कमी पडला. तेव्हा दिलिप कुमार त्यांना म्हणाले, ''तुम्ही आनंद बक्षी ना? मग तुम्हाला पुष्पगुच्छ का देण्यात आला नाही?'' मग दिलिप कुमार यांनी आपल्याला मिळालेला पुष्पगुच्छ त्यांना दिला. आनंद बक्षी आणि दिलिप कुमार यांचा स्नेहबंध या घटनेनंतर कायमचा राहिला .

'जब जब फुल खिले' नंतर आनंद बक्षी यांची अनेक सुपरहीट गाणी आली. 'हिमालय की गोद मे' या चित्रपटातील 'चांद सी मेहबूबा हो मेरी' या गाण्याने प्रसिध्दीचे सर्व रेकॉर्डस तोडले होते. आराधना मधील 'मेरे सपनोकी राणी कभी आयेगी तू' हे गाणे आजही चाहत्यांची हृदये लुभावत आहे. या एका गाण्याने किशोर कुमार शिखरावर पोहचले आणि राजेश खन्नाच्या डोक्यावर सुपरस्टारचा ताज चढला. एस.डी. बर्मनच संगीत निर्देशन होते खरे पण हे गाणे त्यांचा मुलगा आर.डी.बर्मनच निर्देशित करीत होता. एस.डी. तेव्हांच आजारी होते. या गाण्याने आर डी बर्मनच नशीब काढल. 'मिलन' चित्रपटातील 'सावन का महिना पवन करे शोर' हे आणखिन एक अप्रतिम गाणे.

आनंद बक्षी यांनी आपल्या कारकिर्दीत सुमारे सहाशे चित्रपटांना चार हजार गाणी दिली. इतकी सुंदर गाणी हिंदी भाषेत लिहिणारे ते एकमेव कवी आहेत. त्या काळात उर्दू शायरांचा चित्रपट जगतावर पगडा होता. भगवान दादांच्या 'भला आदमी' या चित्रपटात आनंद बक्षी यांना प्रथम संधी मिळाली. आनंद बक्षी गीत लिहितात तेव्हा प्रस्तुत चित्रपटाचे कथानक लक्षात घेऊन त्या एका गीता मध्ये कथानकाचा सारांश उतरवतात ही त्यांची बखासियत होती. 'आपकी कसम' या चित्रपटातील 'जिंदगी के सफर मे गुजर जाते है जो मकाम वो फिर नही आते'

हे गीत किती समर्पक आहे पहा. नायकाचे (राजेश खन्ना) नायिकेवर (मुमताज) अतोनात प्रेम असते. परंतू केवळ नायिकेच्या चारित्र्यावरील खोट्या संशयाने नायक नायिकेपासुन दुर होतो. आपली चूक कळल्यावर नायक नायिकेला भेटायला जातो. परंतू तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. ती त्याच्यापासुन दुर निघून गेलेली असते शहर सोडून. खुप शोधूनही नायिका परत भेटत नाही. तिच्या विरहात डुबलेला नायक कफल्लक होउन अक्षरक्षः रस्त्यावर येतो. गेलेली वेळ आणि माणसे जपली नाहीत तर खुप पश्चाताप होतो. परत ते क्षण नाही येत हे अत्यंत समर्पक रीतीने आनंद बक्षी यांनी या गीतामध्ये गोवले आहे. त्यांच्या प्रत्येक गीताने त्याकाळात लोकप्रियतेचे शिखर गाठलेले होते. १९६७ साली जितेंद्रचा पहिला चित्रपट 'फर्ज' रिलीज झाला. यातले 'मस्त बहारो का मै आशिक मै जो चा हे प्यार करू'

आणि 'हम तो तेरे आशिक है सदियों पूराने' या दोन गीतानी जितेंद्र रातोरात स्टार झाला. राजेश खन्ना आणि आशा पारेख यांचा अभिनय असलेल्या चित्रपटातील असेच एक अनमोल गीत. नायक नायिका एकमेकांस भेटून झाल्यावर घरी परत निघताना निरोप घेताना पाय जड झालेले असतात. क्षणभरही विरह सहन करणे अवघड झालेले असते अशा वेळेस चित्रीत केलेले हे गीत. 'अच्छा तो हम चल ते है फिर कब मिलोगे?' किती हुबेहूब बोलण्यात उतरले आहे बघा.

'एक दुजे के लिए' हा १९८१ मध्ये रिलीज झालेला प्रेमकहाणीवर आधारीत गाजलेला चित्रपट. कमल हसन आणि रती अग्नीहोत्री यांच्या यात भूमिका आहेत. त्यातले आनंद बक्षी यांचे 'तेरे मेरे बीच मे कैसी है रे बंधन अंजाना तुने नाही जाना मैने नहीं जाना' हे गीत. लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी संगीत साज चढविलेले आणि लता मंगेशकर यांच्या सोबत एस.पी. बालसुब्रमण्यम यांनी गायलेले हे गीत अजरामर झाले आहे. आता हे गीत किती अप्रतिम आहे पहा, 'राम करे ऐसा हो जाए मै जागू तू सो जाए मेरी निंदिया तोहे मिल जाए' या गाण्यात भावना किती ओतप्रोत भरल्या आहेत जणू संवाद होत आहे.

शेवटच्या श्वासापर्यंत आनंद बक्षी आयुष्यभर लिहित राहिले. शाळकरी वयातच मी त्यांच्या कविता आवर्जून वाचत असे. मला आठवते प्रत्येक वर्षी हिंदीच्या पाठ्यक्रमात त्यांची एक तरी कविता असायची. सर्वात आधी मी ती वाचायचो.

आनंद बक्षी शेवटच्या काळात खुप आजारी होते. अंथरूणाला खिळले होते. तेंव्हा दिलीप कुमार त्यांना भेटायला घरी गेले होते. दिलीप कुमार यांना पाहून आनंद बक्षी यांचे हृदय उचंबळून आले. ते दिलीप कुमार यांना काहीतरी महत्त्वाचे सांगायला बघत होते. ते उठण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्यांना खुप प्रयत्न करूनही उठता येईना. त्यांचा तो केविलवाणा प्रयत्न पाहून दिलिप कुमार म्हणाले तुम्ही उठू नका मी तुमच्याकडे येतो. दिलिप कुमार बेडवर अक्षरक्षः आनंद बक्षी यांच्या बाजुला झोपले व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)